# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००४ |
| वर्ष | : | चौथे |
| अंक | : | ३ |
| पृष्ठे | : | ३६ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ७८**

MAHMAR 19358/13/1/2000-TC



विद्या प्रसारक मंडळ

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष चौथे / अंक ३ / फेब्रुवारी २००४

## संपादकीय

## पुढे काय होणार आहे?

माणूस आशावादी असतो, त्यामुळेच भविष्याचा वेध घेत तो जगत असतो. भविष्याचा वेध घेऊन उद्याचा मानवी समाज कसा असेल याबद्दल काही भाकिते करण्याचे एक शास्त्र असते. असे काही सांगणे हे अंधारातील चाचपडणे नसते, तर आज आणि कालच्या समाजातील विविध क्षेत्रांतील प्रवाहांचा अभ्यास करून हे विचारमंथन केले जाते.

'आजचं जग कसं आहे' आणि त्या संदर्भात 'उद्या काय होणार आहे' या प्रश्नांच्या चिंतनातून जॉन नेसबिट यांच्या आजही बेस्ट सेलर असणाऱ्या 'मेगा ट्रेंडस्'चा जन्म झाला. या पुस्तकात ट्रेंड थिअरीवर त्यांचं अतिशय तपशीलात विवेचन आहे. १९८२ चं हे पुस्तक, तर १९९० साली 'मेगा ट्रेंडस् २०००' या शीर्षकाचं त्यांनी लिहिलेलं पुस्तकही तुफान गाजलं. या पुस्तकात त्यांनी भाकित केलेले प्रमुख प्रवाह आज मानवी समाजावर प्रभुत्व गाजवत असल्याचं दिसतं.

मुक्त अर्थव्यवस्था, पूर्वी समाजवादी असणाऱ्या देशांतील मुक्त बाजारव्यवस्था, याबरोबरच मानवी समाजात एक असा प्रवाह असेल की, माणसाला एकीकडे वैश्विक पातळीवरील जीवनशैलीचे आकर्षण वाटेल आणि त्याचवेळी स्थानिक पातळीवरील सांस्कृतिक बाबींचा अभिमानही त्याला सोडवणार नाही. प्रसारमाध्यमे, संपर्क साधने यांनी जग जवळ आले तरी माणसे एकाकी पडण्याची शक्यता लेखकाला जाणवलेली असणार. आज एकीकडे जागतिक संकल्पनांचे आकर्षण वाटत असतानाच जगाच्या कोणत्याही संस्कृतीतील माणूस एकीकडे संस्कृतीचा अभिमान बाळगायचा प्रयत्न करताना दिसतोय. ही एक प्रकारची कुतरओढ आहे. नेसबिटने खाजगीकरणाबाबतही केलेली भाकिते खरी होताना दिसत आहे आणि याच संदर्भात मंगळाच्या संदर्भातील मानवी प्रगतीही महत्त्वाची ठरणार, असे दिसत आहे. स्पेस कॉलनीज स्पेस शटलच्या आधारे काम करण्यापुरते पृथ्वीवर यायचे व स्पेसमध्येच राहायचे... कारण पृथ्वीवर राहाण्याजोगे वातावरणच नसेल ... याबाबत नासाच्या संशोधनातून पुढे येत जाणारी भाकिते आज स्वप्नरंजने वाटली तरी उद्याचे वास्तव नसतील कशावरून ? 'ओरायन' लिहिणाऱ्या लोकमान्यांच्या काळात संगणक हे स्वप्नरंजन असू शकले असते.

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष चौथे / अंक ३ / फेब्रुवारी २००४

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री संत तुकाराम महाराज (साधना) | शं. बा. मठ | ३ |
| २) | पुस्तक परिचय - जीवनात गीता | आशा भिडे | ९ |
| ३) | व्यसनांचे सामाजिक दुष्परिणाम | सौ. वंदना सं. प्रसादे | १५ |
| ४) | पुस्तक परिचय - फूल मेंदीचे | मोहन पाठक | १८ |
| ५) | सांगे गीता | मोहन पाठक | १९ |
| ६) | केवळ कृत्रिम श्वासनलिका लावून तलावांना गतवैभव प्राप्त करून देता येईल ? | पुनम सिंगवी | २० |
| ७) | पुस्तक परिचय | संकलित | २४ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# श्री संत तुकाराम महाराज (साधना)

*संतसाहित्य व संतजीवनाचे अभ्यासक श्री. शंकरराव मठ यांच्या ओघवत्या शैलीतील हा लेख. - संपादक*

(लेखांक दुसरा)

तुकोबांच्या वंशात पंढरीची वारी पूर्वीपासून चालू होती व ती तुकोबा तशीच चालवीत. एकदा तुकोबा आजारी पडल्याने त्यात खंड पडला. त्यांनी वारकऱ्यांबरोबर पांडुरंगास चोवीस अभंगांचे पत्र पाठविले. वारकरी परत येईपर्यंत ते उत्कंठतेने पत्राच्या उत्तराची वाट पाहत होते, अशी आख्यायिका आहे. महिपतीने बरेच लांबलचक आख्यान रचिले आहे.

*तुम्ही संतजनी । माझी करावी विनवणी । काय तुक्याचा अन्याय । त्यासी अंतरले पाय ।*

*भाका बहुता रीति । माझी कीव काकुळती । न देखे पंढरी । तुका चरण विटेवरी । (११३६)*

*होईल कृपादान । तरी मी येईन धावोन। होती संताचिया भेटी । आनंदे नाचो वाळवंटी । (११३७)*

*पत्राचे वचन ताप दिले फिरवून । तुका म्हणे काही मना आणिले की नाही ।*

*आजी बरवे झाले माझी माहेर भेटले । डोळा देखिले सजन निवारिल भाग सीण ।*

*धन्य झालो आता क्षेम देऊनिया संता । इच्छिचे पावलो तुका म्हणे धन्य झालो ।*

**गुरुची आवश्यकता -**

सद्‌गती प्राप्त होण्याला गुरुपदेशाची व गुरुकृपेची आवश्यकता आहे, असे अनेकांचे म्हणणे आहे. खरे तर स्वत:च स्वत:चा उद्धार केला पाहिजे; मात्र परमेश्वराचे साहाय्य घ्यावे. आपल्याला चांगला मार्ग दाखविण्याला, ताळ्यावर आणण्याला तो नेहमी तयार असतो. सदा सर्वदा परमेश्वराची कृपादृष्टी आपल्यावर असते. परंतु आपणाला मात्र त्या कृपेची जाणीव नसते. तशी मनाची स्थिती झाली की त्याच्या कृपेचा अनुभव येऊ लागतो. भय, चिंता, दु:खही नाहीशी होतात. मन उच्च वातावरणात वावरू लागते.

हल्ली ग्रंथ उपलब्ध असल्याने ज्ञानमार्गात गुरूची तशी आवश्यकता पूर्वीइतकी भासत नाही. हल्लीचे गुरूही मनाचा विकास न करता आपल्या मर्जीप्रमाणे वाकवितात. सांप्रदायिक गुरूचा मार्ग हा हीन व तेजोभंग करणारा आहे, गुरूचे गोडवे गाण्यातच शिष्य धन्यता मानतात. ग्रंथाध्ययन, मनन, ध्यान, आत्मपरीक्षण, प्रार्थना, सत्संग इत्यादी उपायांनी सध्या कार्यभाग होत आहे.

गुरू अधिक काय सांगणार, असे म्हणणे अहंकाराचे द्योतक होय. नुसते वरदहस्त ठेवला, आमचे जन्माचे सार्थक झाले , आम्हास आता काही करावयास नको, असे म्हणणारे स्वत:ची फसवणूक करून घेतात. त्यांची प्रगती खुंटते. सद्‌गुरू भेटला तर आदर करणे योग्य. अन्यथा गुरुबाजीच्या धंद्यापासून सावध राहणे योग्य.

*एकमेका साहाय्य करू । अवघे धरू सुपंथ ।* हा साधन मार्ग. देवाजवळ कोणाच्याही मध्यस्थीची गरज आहे असे तुकोबांना वाटत नसे.

*आणिकांचे भेटी आडकाठी पडे । येते ते न घडे वचनही । नाही आडकाठी । तुका म्हणे जाता भेटी ।*

*भक्ता प्रकाशितो ज्ञान । स्वयें आपला आपण । तुका म्हणे कृपा करील नारायण । तरीच वर्म पडे ठावे । एक दृढ करी पंढरि राय । मग तुज उपाव पुढती सुचे । आपुलिया*

*यळे घालावी कास । नये पाहे वास आणि कांची । चित्त ठेवा ग्वाही आणि काशी चाड नाही । तुका म्हणे वेगी जाण सुटोनिया । धरोनिया हृदया माजी हरी । गुरु शिष्य पण हे तो अधम लक्षण । 'भूती' नारायण खरा । आप तैसाचि दुसरा ।* (२७१७)

**स्वप्नात दृष्टांत**

*राघव चैतन्य केशव चैतन्य । सांगितली खूण माळिकेची । बाबाजी आपले सांगितले नाम । मंत्र दिला रामकृष्ण हरी । माघ शुद्ध दशमी पाहुनी गुरुवार । केला अंगिकार तुका म्हणें ।*

आपला भार गुरूसारख्या माणसावर टाकून आपण मोकळे व्हावयाचे, असे तुकोबांनी केले नाही. अंत:करण निर्मळ करावयाचे, वाईट संकल्प मनात येऊ द्यावयाचे नाहीत, मन पूर्णपणे ताब्यात ठेवावयाचे, जनी-जनार्दनाला पाहावयाचे, हे त्यांचे ध्येय होते. हे ध्येय अतिशय कष्टसाध्य आहे. तुकोबाना गुरुदर्शनाची आस नव्हती, देवदर्शनाची होती. देव मजवर कृपा करील काय? देवाच्या भेटीनंतर त्यांच्या अंत:करणाची तळमळ नाहीशी झाली. गुरुप्रसादाशिवाय परमार्थ सिद्ध होत नाही, ही गोष्ट तितकीशी खरी नाही. गुरुबाजीचा धंदा करणाऱ्यांनी ती आज उचलून धरली आहे. परमार्थ सिद्ध होतो, तो देवाच्या कृपेने, स्वप्रयत्नाने. देवाला शरण जाणे, सत्संग करणे, भजन, उपासना, प्रार्थना,परोपकार इत्यादी साधनांचा अभ्यास करावा, यालाच प्रयत्न म्हणतात. आपली तयारी होईल. देवाच्या साहाय्याचा प्रत्यय येऊ लागतो. योग्य काळ आल्यावर परमार्थाची प्राप्ती होते.

गुरूला शरण गेलेल्यांच्या अंत:करणात बदल झालेला नसतो. गुरूच्या पायावर पैसा ओततील, मात्र अहंकार रिता करणार नाहीत. रजतम आदी तसेच राहतात. गुरूचे स्तोम माजविणारे ढोंगी बनले व त्यावर विश्वास टाकून राहणारे आंधळे बनले. संतपदवीस चढणे, झाल्यास स्वत:चा प्रयत्न पाहिजे. दीर्घ अभ्यास पाहिजे. देवाची कृपा पाहिजे. गुरूची कृपा हे ध्येय नसून देवाची कृपा हे ध्येय आहे.

बदलणाऱ्या जगाच्या स्वरूपातून, अस्थिर संसारातून आपणाला शाश्वत आणि अविनाशी अशा परमेश्वराला पाहावयाचे आहे. त्याच्या ठायी लीन व्हावयाचे आहे. मनुष्याचे ज्ञान व त्याचा अधिकार नेहमी वाढत असतो. तो अपूर्ण आहे, त्याला पूर्ण व्हावयाचे आहे. ज्ञान ज्याचे त्यानेच प्राप्त करून घेतले पाहिजे. गुरू मार्ग दाखवतो व आपल्या चुका नजरेला आणतो. वाटेतील खाचखळगे दाखवितो, आपणाला उत्तेजन देतो. गुरू जेवढा थोर तितका शिष्याच्या अंगी नवजीवनाचा संचार होतो. यासाठी परमार्थ मार्गावर गुरूचे माहात्म्य सांगितले जाते. तुकोबा म्हणतात-

*पांडुरंग माझा गुरु । पांडुरंग हा माझा तारु ।* अनेक साधकांना असे वाटते की, एकदा गुरू केला म्हणजे आपण कृतकृत्य झालो. गुरूकडून मंत्र घेतल्यावर त्याच्या उपदेशाप्रमाणे कवायत करावी, मग गुरू आपला भार स्वत:वर घेतो. गुरूवर पापाचा भार टाकून पापापासून आपणाला मुक्त होता येणे शक्य नाही. आपण नम्रपणाने, श्रद्धापूर्वक, स्वत: परमार्थाच्या वाटेवर शेवटपर्यंत मार्गक्रमण केले पाहिजे. तुकोबा म्हणतात - ***'भवतारिते दुसरे नाही । कोणी गुरु होत का देव । आणिक तीन्ही.*** या संसारातून तरून जाण्याचा प्रयत्न स्वत:लाच करावयाचा आहे. हे साधन, उपासना, त्याग, आत्मपरीक्षण इत्यादी रूपाने वा अन्य रीतीने असू शकेल.

केलेल्या पापापासून मुक्तता करून घेणे इतकेच आपले ध्येय नसून, पापाची वासना नाहीशी करणे, हृदयातील पापाचे बीज नष्ट करणे, हे ध्येय असते. पापाची वासना नाहीशी करण्यास पश्चात्ताप, आत्मनिरीक्षण, देवाची प्रार्थना, संतांचा सहवास असे अनेक उपाय आहेत. दीर्घ प्रयत्नांची त्यासाठी आवश्यकता आहे. ज्या लोकांनी असे मार्गक्रमण केले, ते पाहून आपणाला खरा मार्ग मिळतो. प्रयत्न करण्यास उमेद येते. असा अनेकांचा अनुभव आपल्या

पाठिशी उभा राहतो. आपल्या प्रयत्नांचा साद्यंत इतिहास अभंगवाणी रूपाने तुकोबांनी आम्हासाठी ठेविला. हा आमचा मोठा वारसा आहे, आपला उद्धार आपणच केला पाहिजे. आपला भार दुसऱ्यावर टाकून स्वस्थ बसणे घातक आहे. *न ऋदते श्रान्तस्य सख्याय देवा:* । देव प्रयत्न करणाऱ्यांनाच मदत करतो. (ऋग्वेद)

संतांकडून जे प्रयत्न झाले तो अधिक शुद्ध पाया होता. या संतमंडळीत विद्वान्, अविद्वान तसेच समाजातील सर्व थरांतील स्त्री-पुरुषांचा हात लागला असल्यामुळे त्यांचे प्रयत्न अधिक व्यापक, अगदी खालच्या थराला वर आणणारे, राष्ट्रीयत्वास पोषक असे होते. जुन्या रूढी काढून टाकण्याचाही प्रयत्न केला. इतर धर्मातील काही तत्त्वे घेतली. माणुसकीच्या सहृदयतेच्या तत्त्वांचा आपल्या शिकवणुकीत अंतर्भाव केला. ही तत्त्वे आपल्या धर्मात आहेत. मात्र ती पुरून ठेवलेल्या धनासारखी होती. संतांनी ती बाहेर काढली, आचरणात आणली. धर्ममार्तंडांकडून होणारा छळ सहन केला. अंत:करणात स्फुरणाऱ्या प्रकाशाच्या साहाय्याने त्यांनी मार्ग चोखाळला. त्यांच्या प्रयत्नाने जागृती झाली. नवीन नवीन पंथ निघू लागले व ते देशभर पसरले. यातील पुष्कळ पंथ तळागाळातील संतांनी काढलेले आहेत.

मनुष्य प्रगतशील प्राणी आहे. त्याला नराचा नारायण व्हावयाचे आहे. मनुष्याचे ज्ञान वाढते, त्याच्या स्थितीत बदल होतो, त्याप्रमाणे धर्माची व नीतीची वाढ होते. या वाढीत खिळ पडला म्हणजे धर्माची ग्लानी झाली असे आपण म्हणतो. हिंदू समाजात झालेली धर्माची ग्लानी पंडितांचे शुष्कवाद, तर्कटे, धर्मकार्यात होणारी पशुहिंसा यामुळे महावीर व बुद्ध यांना धर्मात सुधारणा करण्याची स्फूर्ती झाली. पुढे इस्लाम संस्कृतीचे धक्के बसू लागले. ज्ञानदेवांपासून तुकोबा, रामदासापर्यंतच्या काळातील साधुसंतांना धर्मास चालना देण्याची प्रेरणा झाली.



तुकोबांच्या आत्मोन्नतीचे बीज -

पंढरीची वारी, एकादशी व्रत, विठोबाच्या मूर्तीचे पूजन व भजन आणि कीर्तन, हा तुकोबांचा मार्ग होता. अशाप्रकारे वागणारी इतरही मंडळी आहेत. तुकोबांनी या गोष्टींना विशेष महत्त्व दिले नाही. भाव शुद्ध असणे, चित्त निर्मळ ठेवणे हीच गोष्ट मुख्य आहे असे म्हटले आहे.

*कासया पाषाण पूजिसी पितळ अष्टधातू खळ भावेविण । (२८२७)*

धर्माचे मर्म न जाणता भरमसाटपणाने आचरण करणाऱ्यांचा त्यांनी कठोर शब्दांनी धिक्कार केला आहे. तुकोबा केवळ हरीहरी करत थांबावयास सांगत नसत. आपले एकंदर वर्तन सत्याला धरून व्हावे आणि पवित्र असावे असे सांगत.

*चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्रही न खाती सर्प तया । १७५१*

मकरकुंडले घालणाऱ्या विठ्ठलापासून आरंभ करून क्रमाने भाव शुद्ध करीत थेट नित्य शुद्ध, बुद्ध निर्विकार परब्रह्म गाठले. कुलधर्म साधन म्हणून तुकोबा पाहत. *'तुका म्हणे कुलधर्म दावी । तेवी देव यथाविध । भाव जरी होय'* यथाविध भाव पाहिजे. त्या योगे देवाची प्राप्ती होईल. केवळ कुलधर्म आपल्याला तारणार नाही. आचरणाला नियमन घालणे, मन आवरणे, सतत उन्नत होण्याची इच्छा बाळगणे, हा धर्म होय.

*विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म ।*

*भेदाभेद भ्रम अमंगळ आइकाजी तुम्ही भक्त भागवत । कराल ते हित साच करा । कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचे । तुका म्हणे एका देहाचे अवयव । सुख दुःख जीव भोग पावे । (४६)*

नामस्मरणादी आचार पद्धती

प्रेमाने देवाचे नाव घ्यावे. हे साधन सर्वांच्या आटोक्यातील आहे. हे कोणत्याही काळी व स्थळी करता येते.

भजन-समानशील स्नेही मिळून भजन करणाऱ्यांना परस्परांना सात्विक सहवासाचा लाभ होतो.

एकादशी -या दिवशी उपोषण व भजन कीर्तन - याने इंद्रियदमन करण्याची सवय जडते.

विठोबाची पूजा - तुकोबांचे कुलदैवत. त्याची भक्ती करताना तुकोबांचे पाऊल परमार्थ मार्गात पडले. विठोबा म्हणजे सर्वव्यापक विश्वंभर, या भावनेने साधना चालू ठेवली.

पंढरीची वारी - तुकोबांना उत्साह वाटे. गावांगावांतील भाविक-संतांचा समागम घडतो. भजन - कीर्तनात काळ आनंदाने जातो. *स्वल्प वाटे चला जाऊ । वाचे गाऊ विठ्ठल । तुम्ही आम्ही खेळीमेळी । गदारोळी आनंद । अठरा पगड जाती सकळही वैष्णव । दुजा नाही भाव पंढरीस । पंढरीसी नाही कोणा अभिमान । पाया पडे जन एकमेका । (११७७)*

एकांतवास - नश्वर गोष्टीत मन रमू देणे व ध्यान लावणे या दोन्ही गोष्टी एकावेळी साध्य होत नाहीत. एकांतात मन बाह्यसृष्टीपासून परावृत्त करणे सोपे जाते, तसे ते करून सर्व वृत्तींसह देवाकडे लावले असता भावना उच्च कार्याकडे वळतात. बुद्धीत अंतःप्रेरणा, प्रतिभा, कर्तृत्व यांची वाढ होते. एकांतवास परमार्थाचे एक साधन. तुकोबा म्हणतात - ते साधन आवश्यकच आहे असे मात्र नाही.

*न लगे सांडावा लौकिक व्यवहार । घ्यावे वनांतर भस्म दंड । कलियुगामाजी करावे कीर्तन । तेणे नारायण देईल भेटी ।*

सत्संग - देवावर निष्ठा व सत्संग यावर तुकोबांचा विशेष भर होता.

*वैष्णव तो जया अवघी वेदावरी माया । नाही आणिक प्रमाण तनधन तृणजन । (३६६)*

संत कोण - *जे का रंजिले गांजिले । त्यासि म्हणे जो आपुले । तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा । मृदु सबाह्य नवनीत । तैसे सज्जनाचे चित्त । जयासि आपंगिता नाही । त्यासि धरी जो हृदयी । दया करणे जे पुत्रासि । तेचि दासा आणि दासी । तुका म्हणे सांगो किती । तोचि भगवंताची मूर्ती । (३४७)*

कीर्तन - कीर्तनात देव, भक्त, नाम यांचा त्रिवेणी संगम घडतो. कीर्तन सामुदायिक धर्म आहे.

नम्रता - नम्र झाला भूता । तेणे कोंडिले अनंता ।
१४८०

निर्वैर व प्रेमळ आचरण - निर्वैर व्हावे सर्व भूतांसवे । साधन बरवे हेचि एक । तरीच करील अंगिकार नारायण । बडबड ती सीण येणे विण । (२३९८)

*झाकोनिया डोळे काय जाणतोसी । जरी नाही मानसी प्रेमभाव । करिती विठोबाची भक्ती । दयाधर्म नाही चित्ती । तेथे नाही माया देव । व्यर्थ श्रमतो हा जीव । (२३९८)*

आत्मसंयमन - वासना जिंकणे, मन ताब्यात ठेवणे, यासाठी अभ्यास

*मन माझे चंचल न राहे निश्चल । घडी एकी पळ स्थिर नाही ।*

*आता तू उदास नव्हे नारायणा । ध्यावे मज दीना गांजियले*

*धाव घाली पुढे इंद्रियांची ओढी । केले तडजोडी चित्त माझे*

*तुका म्हणे माझा न चले सायास । राहिलो हे आस धरूनी तुझी । (१७३७)*

<u>आत्मपरीक्षण</u> - सावध करण्याचे प्रसंग संसारात पदोपदी येतात; परंतु आपण डोळे उघडून पहात नाही. साधु मात्र सावध होतात. साधूत व आपणात हाच भेद आहे. आपल्या मनावर त्यांची सक्त नजर असते. वाईट विकार ते शिरू देत नाहीत. स्तुती व अहंकाराला शिरू देत नाहीत.

<u>शरणागती</u> - आत्मनिवेदन - तुकोबा निराश न होता देवाला शरण जात. त्याला आपली स्थिती कथन करीत. मन संयमित करण्यास त्याची मदत मागत. हा तुकोबांचा मार्ग सर्व साधकांना फार उपयुक्त आणि सामर्थ्य देणारा आहे. मनोविकार आवरणे अतिशय कठीण.

<u>परोपकार किंवा जनसेवा</u> - जनी-जनार्दन आहे हे जाणून तुकोबा मदत करायला नेहमी तयार असत. सुरुवातीला तेल-तूप आदी बाजारातून आणून देत. पुढे हरीकीर्तनाने जनसेवा. त्यानंतर राहिलो उपकारापुरता असे उद्‌गार त्यांनी काढले आहेत. विठ्ठल वारकऱ्यांचे उपास्य दैवत आहे. सकळ महाराष्ट्रीयांना विठ्ठलाइतके प्रिय दुसरे दैवत नाही. विठ्ठलाच्या ठायी त्यांची नि:स्सीम भक्ती आहे. विठ्ठलाजवळ भेदभाव नाही. त्याच्या दारी कोणाला मज्जाव नाही. संतांनी नामाचा महिमा परोपरीने सांगितला आहे. समाजात वावरत असताना वैषम्याचे व भेदभावाचे अनिष्ट परिणाम दूर करावेत, हीन-दीनजनांचा कैवार घ्यावा - हे संतांचे ध्येय होते. रूढ वैदिक धर्मात भेदभाव, वैषम्य, पक्षपात हे उघड होते. वेदांचा अधिकार फक्त तीन वर्णांस. स्त्रियांनाही अधिकार नाकारला. यज्ञयागादि धर्मकार्यात भेदभावाचे जाळे पसरले होते. म्हणून संतांनी मार्ग काढला. *हरि मुखे म्हणा । पुण्याची गणना कोण करी । पृथिवी सोवळे आकाश सोवळे । मन हे ओवळे अभक्तांचे । जडी जीवाते उद्धरी । ऐसी नामा माजी थोरी । ते नाम वाचे ज्ञाना । हरे जन्माच्या व्यथा । सकळा सर्व आहे येथे अधिकार । तुका म्हणे नाही जाती सवे काम । ज्याचे मुखी नाम तोचि धन्य । नाम संकीर्तन साधन पै सोपे । जळतील पापे जन्मान्तरे । सुखे येते । घरा नारायण । याविण असता आणिक साधन । वाहातसे आण विठोबाची । तुका म्हणे सोपे आहे सर्वांहुनी । शहाणा तो धणी घेतो येथे । (२४५८)*

वेदाविषयी अधिकाराचे प्रश्न उपस्थित होतात, पण नाममंत्रात काही अडचण नाही. सकलासी येथ आहे

<u>अधिकार</u> - *तुका म्हणे नाही जाती सवे काम । ज्याचे मुखी नाम तोचि धन्य ।*

देवाचे नाव घेणे नुसती तोंडाची कवायत नाही । एकनाथ महाराज म्हणतात - सप्रेम सद्भावे संपूर्ण, नित्य करता नामस्मरण । वृत्ती पालटली आपण । तेही लक्षण ऐका राया । सरिसाच हरी, रिघे हृदया माझारी । तेणे धाके अभ्यंतरी हो लागे । तेव्हा प्रचंड सांडोनी वासना, जडोनी ठाके भगवंत । मनाची मांडली मनोयातना । संकल्प निकल्पना करू विसरे । कृत निश्चयेची बुद्धि होऊनी ठाके । समाधी ऐशा देखोनी । हृदय शुद्धी न निघे हरी । एकनाथी भागवत (३१२)

या लागी आवडी म्हणा रामकृष्ण । जोडा नारायण सर्वकाळी । (३९०५) त्यावेळी चिंतन व ध्यान करावे

नाम उच्चारिता कंठी । पुढे उभा जगजेठी । ऐसे धरोनिया ध्यान । मन करावे चिंतन ।

तुका म्हणे सारष्या । मने हरिरूप पहावे । (१७९४)

देवाचे नाम घेणे हे एक साधन आहे. त्या साधनाला पांडित्य, शास्रात पारंगता, द्रव्याची अनुकूलता, जात किंवा

अधिकार यांची गरज नाही. परंतु आत्मशुद्धी होण्यासाठी सतत प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. आत्मनिरीक्षण करून मन आणि आचरण पवित्र ठेवण्यास झटले पाहिजे. या कार्यी भजन, संतांची भेट यापासून साहाय्य होते. परंतु साधकाकडून स्वत: तसा प्रयत्न झाला पाहिजे.

नाव घेणे म्हणजे जीव आहे म्हणून कवायत करणे नव्हे. आपले मन बरोबर राहणे, देवाच्या गुणांचे स्मरण, स्वरूपाचे स्मरण, मनन, चिंतन केले पाहिजे. याविषयी भ्रामक कल्पना प्रचलित झाल्याने संतांच्या साधनमार्गाविषयी अश्रद्धा उत्पन्न होते. नामसंकीर्तन हे ईश्वर विषयक चित्तजागृतीचे एक लक्षण असून त्यावद्दल विपर्यस्त समजुती लोकांत पसरल्या आहेत. ज्याचे नाव घ्यावयाचे त्याच्यासारखा अधिकार संपादावा असा नामोच्चारातील संकेत बहुधा विसरला जातो. 'राम' या नावात विशेष चरित्र व कर्तृत्व साठविले आहे. देवा आम्ही तुझे म्हणवितो तर आम्ही कामक्रोधाच्या तडाख्यात का सांपडावे? म्हणजेच ज्याचे नाम त्यासारखे आपले जीवन विकसित करावयाचे म्हणून नाम म्हणजे संकेत असा अर्थ केल्यास गैरसमज दूर होतील.

तुकोबा म्हणतात - करूनिया शुद्ध मन । नारायण स्मरावा । (३३२५)

ज्यासी विषयाचे ध्यान त्यासी कैसा नारायण । इंद्रियासी नेम नाही । मुखी राम म्हणोनी काही । (४१५५)

ज्याचे जया ध्यान, तेचि होय त्याचे मन । गोविंद गोविंद मना लागलिया छंद । मग गोविंद ते काया । भेद नाही देवा तया । (२३२७)

हे नामस्मरणाचे ईंगित आहे. आधुनिक मानसशास्त्राच्या सिद्धांतालाही हे जुळणारे आहे.

कीर्तन - सुखाच्या आणि आनंदाच्या वाणीने करणारे सुलभ आणि त्वरित इष्टस्थानाला नेणारे हे ईश्वरप्राप्तीचे साधन आहे. तुकोबा म्हणतात - *आता कथा आवश्यक । येर संवादू लौकिक* । हरीकथा हे आमचे जीवन आहे. इतर साधने केवळ लौकिकासाठी. कीर्तनाला रंग भक्तीनेच येतो.

नामदेव म्हणतात - *त्रिविध तापे प्राणी होतात तप्त । शीतळ करीत कथामृते । अमृतापरिस तुझी कथा अधिक । सांगतसे ऐक देवराया । स्वर्गीचे अमृत प्राशन करिती । पुण्य सरल्या येती मृत्युलोका । तुझी कथा देत अच्युत पदासी । न विचारी मानसी यानी काही ।*

नामदेवाचा मुलगा गोंदोबा म्हणतो - *भावे भक्ती नामे करावे कीर्तन । आशाबद्ध मन करू नये ।*

*निष्काम करावे देवाचे कीर्तन । भय हे सोडून शरीराचे । रणामधे कैसा फिरतो रणशूर । होवोनी उदार जीवावरी । तैसा पांडुरंगी धरा हो निर्धार । उतरा हा पार भवसिंधु ।*

एकनाथ महाराज - *नाव संगे अंतरंगे नाम बोलावे । कीर्तन रंगी देवा संनिध सुखेचि डोलावे ।*

*भक्तिज्ञानाविरहित गोष्टी इतर न कराव्या । प्रेमभरे वैराग्याचा युक्ति विवराव्या*

*जेणे करूनी मूर्ती ठसावे अंतरी श्रीहरीची । ऐसी कीर्तन मर्यादा ही संतांचे घरची ।*

*भगवत् भाव सर्वांभूती या नाव गा अभेदभक्ती । हे आकळल्या भजन स्थिती । अहंकृती उरेना । (३९५)*

भक्तांना जन्ममरणाचा धाक नाही, मोक्षाची पर्वा नाही, त्यांना कोणाची गुलामगिरी करावी लागत नाही.

एकमेका साहाय करीन. परस्परांच्या सहवासात ते खेळीमेळीने आनंदाने परमार्थ मार्ग आक्रमितात. मी भक्त तू देव या द्वैतावर त्यांच्या मार्गाची उभारणी झाली आहे.

नामदेव - नामदेव कीर्तन करी पुढे वा नाचे पांडुरंग । जनाबाई म्हणे नामदेवा बोला अभंग ।

(पान क्र.१४ वर)

कौटुंबिक, व्यावसायिक व सामाजिक

# जीवनात गीता

## सुखाचा व सदाचाराचा मार्ग, दुःख -दुराचाराची मीमांसा

- लेखक : डॉ. गजानन खैर

पुणे विद्यार्थीगृह प्रकाशनाने प्रकाशित केलेली १९८१ ची आवृत्ती. लेखक डॉ. गजानन खैर, मुखपृष्ठ वैशिष्ट्यपूर्ण आहे. जीवनातील निरनिराळी क्षेत्रे कारखाना, व्यापार, कुटुंब, वाङ्मयकला, तरुण गुन्हेगार, ध्यानयोग, रणक्षेत्र, क्रीडाक्षेत्र, मेंटल हॉस्पिटल, समानता कार्यालय, व्यसने, राजकारण, शिक्षणसंस्था, न्यायालये, तुरुंग या सर्व आघाड्यांवर यशस्वी होण्यासाठी जीवनात गीतेचं किती महत्त्व आहे, हे सूचित करणारे आहे.

१९७८-७९ मधे पुण्यातील 'स्वराज्य' साप्ताहिकांत दर रविवारी एक याप्रमाणे या पुस्तकातील तेहेतीस लेख प्रसिद्ध झालेले आहेत. त्याच लेखांचा हा ग्रंथ. मूल्य बारा रुपये. प्रस्तावना लेखकाचीच आहे. अगदी एकपानी. 'नवा व स्वतंत्र दृष्टिकोन' असे त्याचे शीर्षक आहे. लेखक म्हणतात- ''माझ्या इतर ग्रंथांत संपूर्ण गीतेचं विवरण मी केले आहे. या पुस्तकात गीतेतील अत्यंत महत्त्वाचे श्लोक, विचार व तत्त्वे विस्तारपूर्वक सांगून त्याची आजच्या काळात उपयुक्तता काय, ते दाखवले आहे.'' सुमारे तीनशे श्लोकांचा यात निर्देश केला आहे. यात मूळ संस्कृत श्लोक न देता ( पाने वाढतील म्हणून) तो सहज समजावा म्हणून लेखकाने स्वतःच लिहिलेल्या 'सर्वबोध पद्यगीता' या पुस्तकातील मराठी समश्लोक दिले आहेत.

आपला स्वभाव सुधारण्यावर गीतेचा भर आहे. हा गीताकाराचा नवा दृष्टिकोन यात प्रामुख्याने मांडला आहे. स्वभाव सुधारला की, ऐहिक जीवन सुखाचे व सदाचाराचे होईल आणि परमार्थाचीही तयारी होईल. माझे हे अगदी नवीन, परंतु पूर्णपणे व सर्वस्वी गीतेला धरून केलेले विवेचन आहे, असे लेखकाने म्हटले आहे.

चाळिशीच्या आतील व्यक्तींना गीतेची फारशी माहिती नाही, गोडीही नाही व जरूरीही वाटत नाही. गीता हा जड तत्त्वज्ञानाचा, म्हातारपणी वाचण्याचा, तरुणांना व सामान्यांना अनावश्यक व अनाकलनीय हा गैरसमज समाजात झालेला आहे. म्हणून आजच्या परिभाषेत व आजच्या जीवनाला धरून गीतेचा विचार सांगणे आवश्यक आहे. गीता हा ग्रंथ केवळ कुरुक्षेत्रावरील अर्जुनाकरिता नसून जीवनक्षेत्रातील सर्व बालक, पालक, युवक व वृद्धांकरिता आहे.

महत्त्वाच्या तीनशे श्लोकांवर तेहेतीस प्रकरणे या पुस्तकात आहेत. संपूर्ण तेहेतीस शीर्षके सांगत नाही, पण थोडी झलक म्हणून काही प्रकरणांची ही शीर्षके पहा-

संघर्ष प्रसंगातील दोन प्रश्न, स्वभावाचे नमुने - एक संगीतिका, सदाचार व सुख यांचा शोध, प्रश्न तीन, पण उत्तर एक, आचार, विचार व भावना, मानवतावादी ईश्वरज्ञान, ध्यानाने स्वभावात सुधारणा, सुसंस्कृत मानवाची शब्दचित्रे, विचारांचे संकलन व सिंहावलोकन. गीतेच्या अध्यायांच्या नावापेक्षा वेगळी नावे असलेले हे गीतेवरील पुस्तक इथूनच वेगळेपण सूचित करते.

लो. टिळकांची गीतारहस्यावरील व्याख्याने ऐकण्यास १९१४-१५ साली शालान्त परीक्षेचा विद्यार्थी असताना लेखक जात असे. पण शंकराचार्य सांगतात त्याप्रमाणे, गीता संन्यासमार्गी नसून कर्मयोग प्रधान व प्रवृत्तीपर आहे, इतकेच त्यावेळी कळले. त्याआधी गीतेचा परिचय नव्हता. १९२०ला नियमित गीतावाचन चालू केले. त्यावेळी मनात जिज्ञासा होती, कोणाचे म्हणणे खरे ? बरोबर? असे मतभेद का असावेत ? लेखकाला दोन्ही बाजू खऱ्या वाटायच्या. गीतेचा एक निश्चित अर्थ असला पाहिजे, ही लेखकाची पूर्वीपासून धारणा होती. (लोकमान्यांनी गीतेचा अर्थ कर्मपर लावला त्याला त्यावेळची परिस्थिती कारणीभूत होती. पारतंत्र्यात सापडलेला देश थंड गोळ्याप्रमाणे निष्क्रिय झाला

होता. त्यात स्फुलिंग पेटवायचं होतं. देशाला चैतन्य प्राप्त करून द्यायचं होतं, म्हणून लोकमान्यांनी गीता कर्मपर आहे असंच सांगितलं. भगवंतांनीही अर्जुनाला युद्धप्रवृत्त करण्यासाठी 'तू कर्मयोगी हो' हेच सांगितलं. ज्ञान आवश्यक, पण कर्मही तितकंच महत्त्वाचं. कारण 'ज्ञानाविना कर्म आंधळं व कर्माविना ज्ञान पांगळं' आहे, असं गीतारहस्यकारांनीच सांगितलंय. ज्ञान हे कर्माचे शिखर व कर्म हे ज्ञानाचा पाया. १९३१ पासून लेखकानं पुन्हा गीता अभ्यासाला प्रारंभ केला; पण व्यवसायानिमित्त परदेश दौरे करावे लागल्यामुळे गीतेकडे लक्ष देता आले नाही. निवृत्तीनंतर मात्र १९६६ पासून पाश्चात्यांना गीतेचा निश्चित एक अर्थ सांगता आला पाहिजे या दृष्टिकोनातून अभ्यास व संशोधन चालू केले. त्यातून जो अर्थ लागला तो सर्व समाजाला सोप्या भाषेत व आजच्या जीवनाच्या संदर्भात सांगावा अशी प्रेरणा झाली. या भावनेने दहा-बारा वर्षे प्रयत्न केला. या प्रयत्नातील एक भाग म्हणजेच, हा ग्रंथ.

गीतेतील तत्त्वज्ञान हे जीवनातील संघर्षाला, कठीण प्रसंगाला सामोरे कसे जावे, हेच सांगणारे आहे. म्हणूनच गीतेला युद्धाची पार्श्वभूमी दिली आहे. नाहीतर एखाद्या वैठ्या प्रसंगीही अर्जुनाला हे तत्त्वज्ञान श्रीकृष्ण सांगतोय असे महाभारतात व्यासांना दाखवणे कठीण नव्हते. (पण खरोच जर गीता रणांगणावरच सांगितली गेलीय तर तिची जागा बदलेल कशी?) लेखक म्हणतो, ज्या ठिकाणी ज्या प्रसंगी प्रश्न निर्माण होतात ते त्याच ठिकाणी त्याचप्रसंगी सोडवले तर ज्ञान पक्के होते. उदा. मेडिकलच्या विद्यार्थ्यांना हॉस्पिटलमध्ये, इंजिनियरिंगच्या विद्यार्थ्यांना वर्कशॉपमध्ये, शेतकी शिक्षण घेणाऱ्यांना शेतामध्ये काम करताना दिलेले ज्ञान जास्त उपयुक्त ठरतं. हे तत्त्व लक्षात ठेवून गीतेने जीवनाच्या संघर्षाच्या प्रसंगात उत्कट स्वरूपात निर्माण होणारे जिवंत प्रश्न घेऊन ते सोडवून दाखवले आहेत, आणि नंतर त्याच्या मुळाशी असलेल्या तत्त्वज्ञानाची चर्चा केली आहे.

दुसऱ्या प्रकरणात शेवटी लेखकाने केलेले विवरण लक्षात घेण्यासारखेआहे. पूर्वीच्या ग्रंथात फलश्रुती म्हणून एक भाग असे, तसा गीतेतही आहे. फलश्रुतीमध्ये ग्रंथकर्त्यांचा हेतू प्रतिबिंबित होतो. गीतेच्या शेवटच्या श्लोकात संजयानेही फलश्रुती सांगितली आहे.

*यत्र योगेश्वरः कृष्णः यत्र पार्थः धनुर्धरः ।*
*तत्र श्रीः विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥ १८.७८*

गीतेच्या पहिल्या श्लोकातील पहिला शब्द 'धर्म' आणि शेवटच्या श्लोकातील अंतिम शब्द 'नीती'. 'धर्म आणि नीती' यांच्या मर्यादेत मानवाने वैभव मिळवावे, हा गीतेचा हेतू व फलश्रुती आहे.

**स्वभावाचे नमुने** - एक संगीतिका या तिसऱ्या प्रकरणात लेखक म्हणतो - गीतेचा प्रारंभ नाट्यपूर्ण आहे. नाटिकेला लागणारे सर्व घटक, पात्र, स्थळ, प्रसंग, हालचाली, संवाद, स्वभाव, दृश्ये, ध्वनी, समस्या या सर्व गोष्टी गीतेच्या १ ल्या अध्यायात आहेत. या सर्व प्रसंगांना साजेल अशी वक्तृत्वपूर्ण भाषाही वापरली आहे. व्यक्तीच्या समस्या अखिल मानवजातीच्या पातळीवर नेलेल्या आहेत. गीतेतील ही प्रारंभीची एकांकिका शाळा-कॉलेजच्या गॅदरिंगमध्ये करण्यासारखी आहे.

मानव सदाचरणी कसा होईल? हा गीताकारांचा 'वैचारिक' शोध आहे. आजच्या भ्रष्टाचारप्रधान समाजातील भारतातीलच नव्हे तर सर्व जगातील विचारवंतांनाही याच प्रश्नाने दिङ्मूढ केले आहे.

गीतेत फक्त पहिलाच श्लोक धृतराष्ट्राच्या तोंडी आहे. पुढे संपूर्ण गीताभर तो काहीच बोलत नाही. त्यावरून लेखक असा युक्तिवाद करतो की आंधळा धृतराष्ट्र नसून संजय आंधळा असावा ! त्याला प्रश्न विचारून बोलता करून धृतराष्ट्र निघून गेला आणि तो आहे असे समजून संजय आपला बोलतच राहिला ! हा एक विनोदी विचार लेखकाच्या मनात आला. पण धृतराष्ट्र ऐकत असल्याची जाणीव संजयाला शेवटपर्यंत आहे. म्हणून त्याला व गीतेतील संवादाला उद्देशून तो म्हणतोय,

'राजन संस्मृत्य संस्मृत्य संवादमिममद्भुतम् ।
*केशवार्जुनयोः पुण्यं हृष्यामि च मुहुर्मुहुः ॥१८.७६ ॥*

पहिल्या श्लोकातील 'मामका:' शब्दातून गीताकारांनी 'मी आणि माझे' हा बहुसंख्य मानवांचा स्वभावदोष सूचित केला आहे. त्यांना गीतेने सर्वभूतहिताची, सर्व भूतात्मा होण्याची, इतरांचे सुखदु:ख पाहण्याची, लोकसंग्रहाची किंवा समाजहिताची दृष्टी दिली आहे.

पहिल्या अध्यायात अर्जुनाचा झालेला हॅम्लेट, त्याच्या भावनांचा चढउतार गीताकारांनी कलाकुसरीनं रंगवलाय. भावना व देह यांचा परस्परांवर होणारा परिणाम हे आधुनिक मानस-आरोग्यशास्त्रातील (मेंटल हायजीन) तत्व या ठिकाणी गीताकारांनी उत्कृष्ट दाखवले आहे. दृश्य-श्राव्य-नाट्य इथे संपून तात्त्विक संवादाला आता प्रारंभ होईल, हे लेखकाचे स्वत:चे मत आहे.

सुख-दु:ख, पाप-पुण्य व कर्मनिर्णय हे गीतेतील तीन सर्वात महत्त्वाचे प्रश्न आहेत. ते उत्कट स्वरूपात व्यक्त करण्याकरिता व्यासांनी युद्धाचा प्रसंग निवडला आहे. हे पुन्हा पुन्हा सांगण्याचा लेखकाचा उद्देश ते वाचकांच्या मनावर ठसावे, हा आहे. दु:ख आणि पातक हे प्रश्न ज्यात उत्कट स्वरूपात अंतर्भूत झाले आहेत, असा हा प्रारंभीचा प्रसंग गीताकारांनी निवडला आहे. सुख-दु:ख हा मानसशास्त्राचा विषय आहे व पापपुण्य किंवा सदाचार-दुराचार हा नीतिशास्त्राचा विषय आहे. लेखक म्हणतो, जगातील दोन महान धर्मांची स्थापना या दोन मौलिक प्रश्नांची सोडवणूक करण्याकरिता झाली आहे. जगातील दु:खाचा प्रश्न सोडविण्याकरिता बुद्धाने आपले धम्मचक्र-प्रवर्तन केले, तर मानवाचे पातक आपल्या शिरावर घेऊन त्याला पापमुक्त करण्याकरिता येशू ख्रिस्ताने आत्मबलिदान केले व एका धर्माची स्थापना केली. गीतेने दु:ख आणि पाप हे दोन्ही प्रश्न घेऊन त्यांची तर्कशुद्ध पद्धतीने मीमांसा केली आहे. म्हणून या ग्रंथाचे महत्त्व केवळ भारतीयांनाच नाही तर अखिल मानवजातीला आहे. बौद्ध आणि ख्रिस्ती धर्मियांनाही त्यांच्या धर्माच्या दृष्टीने गीतेचा फार उपयोग आहे.

निवृत्तीनंतर काय करता? असे एका सद्गृहस्थांनी लेखकाला विचारले. तेव्हा लेखकाने उत्तर दिले, 'मी हल्ली गीतेचे कार्य करतो.' तेव्हा ते म्हणाले, 'गीता आता जुनी झाली. त्यातच किती काळ घोटाळणार? आजचे विज्ञान युग आहे. त्याला अनुरूप काहीतरी करा. तेव्हा लेखकाने उत्तर दिले, 'जगात प्रत्येक घटकेला नवा मानव आपल्या मूलभूत प्रवृत्ती घेऊन जन्माला येत आहे. त्यात दु:ख व पाप यांची बीजे आहेत. तोपर्यंत गीता आवश्यकच राहणार आहे. तिला जुनेपणा नाही.' (भगवान शंकरांनी गीतेला नित्यनूतन म्हटले आहे.) हे उत्तर अगदी योग्य व सत्य आहे.

मी माझ्या साडेतीन हात देहापेक्षाही मोठा आहे. त्या व्यापक अशा विश्वव्यापी समाजाच्या सुखात मी माझे सुख पाहिले पाहिजे. ही गीतेची शिकवण आज फार मोलाची आहे. पाश्चिमात्त्य विचारवंत त्यांच्या समाजातील भ्रष्टाचाराचा व दु:खाचा विचार करताना याच सिद्धांताप्रत आले आहेत.

गीताश्रवण करण्यापूर्वीचा अर्जुन व गीताश्रवणानंतरचा अर्जुन यात काय फरक आहे, याचा गीता अभ्यासकांनी सखोल विचार करावा. दुर्योधनाचा अन्यायी स्वार्थ, गीताश्रवणापूर्वीचा अर्जुनाचा वैराग्ययुक्त स्वार्थ आणि गीताश्रवणानंतरच्या अर्जुनाची लोकहितवादी दृष्टी, सर्वभूतहित बुद्धी, लोकसंग्रह वृत्ती व सामाजिक जाणीव यात तुलना करून पाहिले म्हणजे गीता काय सांगते हे कळेल.

'सर्वबोध पद्यगीता' या पुस्तकात लेखकाने समश्लोकी महागीता रचलेली आहे. या पुस्तकात मूळ संस्कृत श्लोक न देता लेखकाने लिहिलेले गीतेवरील मराठी श्लोक उद्धृत केले आहेत व त्यावरच विवेचन व विवरण केले आहे. हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य व वेगळेपण आहे. त्या मराठी श्लोकांची थोडी झलक बघूया -

१८ व्या अध्यायात गीता सांगून झाल्यावर कृष्ण अर्जुनाला विचारतो -

*एकाग्र चित्त ठेवूनि शास्त्राचे श्रवण साग्र केले का? ।*
*गोंधळ तुझ्या मनातील संशय अज्ञान नष्ट झाले का?*
१८.७२

त्यावर अर्जुनाचे उत्तर -

*कृष्णा तुझ्या कृपेने गोंधळ गेला विवेक आठवला ।*
*संशय सर्व निमाला अनुसरतो मी तुझ्याच वचनाला ॥*
*१८.७३*

'करिष्ये वचनं तव' याचा अर्थ 'मी युद्ध करतो' असा मर्यादित घ्यायचा नाही. गीता केवळ युद्धापुरती, अर्जुनाला सांगितलेली नाही. अर्जुनाबरोबर सर्व मानवजातीला जन्मभर आचरण्याकरिता ती सांगितली. हा आशय व्यक्त करण्याकरिता लेखकाने गीतेत नसलेली, पण गीताकाराच्या मनात अध्याहृत असलेली ओळ कंसात घातली आहे. ती अशी - (सतत जीवनी मम या जागृत ठेवीन योगवृत्तीला ॥)

या योगवृत्तीमध्ये अनेक मनोवृत्ती अंतर्भूत आहेत. समाजाशी संबंधित कोणतेही काम करताना, माणसाने ही दृष्टी ठेवावी म्हणजे दुःख आणि पाप या दोषांपासून त्याची मुक्ती होईल. हे गीताकारांनी अर्जुनाला व आपणा सर्वांना पुन्हा पुन्हा आवर्जून सांगितले आहे. हे लक्षात ठेवले पाहिजे, हे लेखकाचे सांगणे आहे.

गीतेने सांगितलेली व्यावसायिक नीती ही प्रत्येक नागरिकाच्या मनावर, अंतःकरणावर बालपणापासूनच शैक्षणिक व प्रचाराच्या सर्व साधनांच्या साहाय्याने बिंबवली तर समाजातील भ्रष्टाचार काही प्रमाणात तरी कमी होईल. अगदी सत्ययुग येणार नाही, पण आज जो अतिरेक झाला आहे तो कमी होईल.

दुसऱ्या अध्यायातील बावीस व बत्तीस या श्लोकात लाभ यदृच्छया झाला तर त्यात पाप नाही, म्हणजे मीटरप्रमाणे भाडे, स्केलप्रमाणे वेतन, नियमाप्रमाणे मोबदला या मर्यादेत लाभाची अपेक्षा करण्यात पाप नाही. पण लोभाने, भ्रष्टाचाराने मिळवलेल्या लाभात पाप आहे. लेखक म्हणतो, संपत्ती, सत्ता, कीर्ती, ऐश्वर्य, सुखोपभोग या ऐहिक गोष्टी विरोधात गीता नाही. तिचा भर धर्म, न्याय, नीती, सदाचार, कर्तव्यबुद्धी, समाजधारणा, लोकहित यावर आहे. स्वार्थापेक्षा समाजहिताला, व्यवसायाच्या हेतूला प्राधान्य द्यावे. यदृच्छा लाभात न्यायाने, नियमाने मिळणाऱ्या लाभात संतोष मानावा. हा गीतेने व्यवसायाचा वेदान्त सांगितला आहे.

माणसाचे स्वभाव कसे आहेत व कसे असावेत, हा गीतेचा शेवटपर्यंत चर्चेचा विषय आहे. गीतेचा अभ्यास करताना वाचकाने एक दृष्टी पुढे ठेवावी की, 'माझा स्वभाव कसा आहे? गीतेच्या अभ्यासाने मी त्यात काय सुधार करू शकेन? दुराचारापासून दूर राहण्याकरिता सदाचार घडण्याकरिता, दुःखावर मात करण्याकरिता, सात्त्विक सुख मिळवण्याकरिता मी माझ्या मनोवृत्तीत, विचारात व भावनेत काय सुधारणा करायला हवी? कोणत्याही प्रसंगाला धैर्याने व आत्मविश्वासाने तोंड देण्याकरिता माझा स्वभाव कसा असावा? या दृष्टीने गीतेचे वाचन केले तर वाचकाच्या जीवनात, स्वभावात हळूहळू इष्ट परिवर्तन होऊ लागेल. स्वभावात बदल झाला की वर्तनात आपोआप उतरेल. विचार, मनोवृत्ती आणि वर्तन यात परिवर्तन करण्याला या ग्रंथाचा फार उपयोग आहे. खरा ज्ञानी, सुशिक्षित व सुसंस्कृत कसा असावा, याबद्दलची तेराव्या अध्यायातील पुढील वचने पहा -

*अति गर्व दंभ सोडी क्षमा अहिंसा स्वभाव निष्कपट ।*
*संयम धैर्य मनाचे शुचिता आचार्य वंदना इष्ट ॥ १३.७*
*निष्कामता स्वकर्मी स्वजनी स्वधनी सदा अनासक्ती ।*
*इष्ट अनिष्ट प्रसंगी चित्ती समतोलता, मनःशांती ॥१३.८*

अशा ओळी सर्वांनी आपल्या घरात, अभ्यासिकेत व कार्यालयात नित्य दृष्टीपुढे लावायला हव्यात व त्यावर आत्मपरीक्षण करायला हवे, हे लेखकाचे सांगणे आहे.

सुसंस्कृत व्यक्तीने जगाकडे, समाजाकडे व आपल्या जीवनाकडे पाहण्याची कोणती दृष्टी ठेवावी, तेही गीतेमध्ये अनेक ठिकाणी सुचवले आहे. बघा -

*दुर्मिळ कोणी सज्जन बहुजन्मी ज्ञानसाधना करितो ।*
*ईश्वरमय विश्वचि हे उमगुनि ज्ञानी मलाचि तो मिळतो ॥ ७.१९*
*परमेश्वर अविनाशी समतेने राही सर्वभूतात ॥१३.२७*
विश्वामध्ये पसरला समतेने ईश पाहि जो युक्त ॥ १३.२८

आपुलकीच्या भावे सुख दु:खे जो जगातील बघतो ।
समतेच्या दृष्टीने तो योगी थोर मानिला जातो ॥ ६.३२

लेखक म्हणतो, इंद्रियसुखप्रधान, भोगवादी अशा आजच्या युगात हा निराळाच आदर्श आहे. या नवीन दृष्टीने गीता वाचली तर आजही ती योग्य मार्गदर्शन करील.

वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक प्रश्नांकडे पाहण्याचा भारतीयांचा दृष्टिकोन गीतेत आहे. गीतेच्या संमिश्र, संभाषणात्मक, तुटक तुटक, बहुविषयात्मक रचनेमुळे तिच्यातील सुसंगत तत्त्वज्ञानाचे आकलन सर्वसामान्यांना सहज होऊ शकत नाही. वैयक्तिक पातळीवरून गीतेने वैश्विक पातळीवर नेऊन सोडले आहे. ते सर्व नीट आकलन करून घेणे जरूर आहे. प्रारंभापासून अखेरपर्यंत आपल्या मनावर एक निश्चित संस्कार करण्याचा गीतेचा प्रयत्न आहे.

समाजात बुद्धिवादी व श्रद्धावादी असे दोन वर्ग असतात. त्या उभयतांना गीतेतील विचारधन स्वीकारणीय व चिंतनीय होईल. योगवृत्ती हे साधन ऐहिक जीवनाला उपयोगी पडते तसेच पारमार्थिक ध्येयसाधनेलाही साहाय्य करते. अर्थ व काम हे पुरुषार्थ कसे साध्य करावे, हे गीता उत्तम प्रकारे सांगते. ऐहिक जीवनातून आध्यात्मिक मनोवृत्ती कशी निर्माण होऊ शकते, हे गीता शिकवते. त्याचकरिता तिचा कर्मावर भर आहे. गीता ऐहिक व आध्यात्मिक जीवनाला सारखेच महत्त्व देते.

'युद्ध हे राज्यप्राप्तीपेक्षा सामाजिक न्याय प्रस्थापनेकरिता आहे. त्याचा समाजावर दीर्घकाल नैतिक परिणाम होणार आहे म्हणून यश-अपयश, सुख-दु:ख, लाभ-अलाभ सर्व समान मानून कर्तव्यबुद्धीने व योगवृत्तीने धर्मकर्म म्हणून हे युद्ध करणे जरूर आहे' हे गीतेचे मुख्य ज्ञान कृष्णाने अर्जुनाला युद्धभूमीवर थोडक्यात दिले असेल. त्याचा कृष्णद्वैपायन व्यासांनी विस्तार केला. त्यात वैशंपायनाने भर घातली. कालांतराने सौतीउग्रश्रवा पौराणिक याने महाभारताचे तिसरे संस्करण केले. यावेळी गीतेचाही विस्तार करून आजची गीता पूर्ण केली. तत्त्वज्ञान बीज कृष्णाचे आणि त्याचा विस्तार तिघांचा आहे.

सांप्रदायिक व प्रचलित विवरणापेक्षा या ग्रंथातून निराळे विवरण व निराळी दृष्टी स्वीकारलेली आहे. गीतेच्याच आधाराने गीतेचा अर्थ काय लागतो आणि तत्त्वज्ञान काय आहे, ते आजच्या भाषेत व आजच्या परिस्थितीला अनुलक्षून सांगितले आहे. गीतेचे हे स्वतंत्र व प्रामाणिक विवरण आहे, असे लेखक म्हणतो.

नवीन विज्ञान युगात निर्माण होणाऱ्या प्रश्नांना तोंड देण्याकरिता मानवाने कशी मनोवृत्ती ठेवावी, हे समजण्याकरिता सर्व मानवांना हा ग्रंथ आवश्यक आहे. माणूस आस्तिक असो वा नास्तिक असो, सनातनी असो वा प्रागतिक असो, गीतेचे तत्त्वज्ञान आकलन झाल्याशिवाय तो खऱ्या अर्थाने सुशिक्षित व सुसंस्कृत होऊच शकणार नाही.

आंतरिक तळमळीने लिहिलेले 'जीवनात गीता' हे दुर्मिळ पुस्तक हाती लागल्यास वाचकांनी सुखाचा व सदाचाराचा मार्ग व दु:ख-दुराचाराची मीमांसा करणारे, नवा व स्वतंत्र दृष्टिकोन असलेले, जरूर वाचायलाच हवे.

**जीवनात गीता**

लेखक : डॉ. गजानन श्री. खैर
पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन,
पृष्ठ - २१०, मूल्य - १२ रु.
आवृत्ती - १९८१

**आशा भिडे**
बी/१, विजय अपार्टमेंटस्,
'आराधना' टॉकीजजवळ,
ठाणे (प.) - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५४१ ०१५०

(पान क्र. ८ वरून)

## श्री संत तुकाराम महाराज (साधना)

अभंग बोलता रंग कीर्तनी भरला । प्रेमाचेनि छंदे विठ्ठल नाचू लागला ।

ऐसा कीर्तन महिमा सर्वांमाजी वरिष्ठ । जडमूढ भाविका सोपी केली पायवाट ।

***कीर्तनात देवभक्त आणि नाम यांचा संगम होतो. कथा त्रिवेणी संगम देवभक्त आणि नाम ।***

कर्मांचा विशेष तिटकारा ज्ञानमार्गी लोकात अधिक आहे. भक्तीमार्गातील साधुसंतांचे ध्येय देवाला संसारात आणून त्याच्या नावाने त्रिभुवन उज्वल व पवित्र करावे आणि सकल संसार आनंदाने भरून काढावा, हेच होते. भक्त मुक्तीसाठी हपापलेले नसतात तुकोबा म्हणतात - ***न लगे मुक्ति धन संपदा । संत संग देई सदा । तुका म्हणे गर्भवासी सुखे घालावे आम्हासी ।***

प्रेम, दया, सहानुभूती, स्नेह यांची अनुकूलता असेल तर इतर साधनांसाठी अडून राहणार नाही. संतांची चरित्रे हे आपणाला शिकवीत आहेत. त्यांच्या चरित्रापासून हे शिकावयाचे असते. संत आपले वाङ्मय ठेवून गेले, पण त्यांचा अनुभव आत्मसात करण्याची ताकद, त्यांनी ठेवलेल्या धनाचा उपभोग घेण्यापूर्वी पुण्याई आमच्या आंगी नाही. आम्ही बाहेरील पोशाखाकडे पाहतो आतील गाभ्यापर्यंत आमची दृष्टी पोहचत नाही. अर्थे लोपली पुराणे। नाश केला शब्द ज्ञाने । अशी आमची स्थिती आहे.

(क्रमश:)

शं. बा. मठ
६, कुमार आशिष,
राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.

•••

मा. पाठक सर,

'दिशा'चा जानेवारी २००४ चा अंक वाचला. प्रा. प्रदीप कर्णिक यांच्या लेखातील विचार भावले. त्याचबरोबर नेमक्या शब्दांत अचूक भावना व्यक्त करणारे आपले संपादकीय वाचले. 'दिशा'च्या नियमित वाचक म्हणून 'दिशा'ला मी चांगली वाटचाल तर इच्छितोच, पण 'दिशा'चा दर्जा टिकविणाऱ्या लेखकाचे विशेष आभार मानतो !

कळावे,

प्रा. अशोक ठाकूर
ग्रंथपाल
सोनोपंत दांडेकर महाविद्यालय,
पालघर, जि. ठाणे.

स.न.वि.वि.

प्रा. ठाकूर यांच्याप्रमाणे अनेकजण प्रतिक्रिया पाठवितात. सर्वांचा आमच्या विद्या प्रसारक मंडळातर्फे व व्ही.पी.एम्. दिशा तर्फे मी आभारी आहे.

- कार्यकारी संपादक

# व्यसनांचे सामाजिक दुष्परिणाम

*व्यसनाधीनता वाढली आहे, सातत्याने वाढ होत आहे. या व्यसनाधीनतेने अक्षरश: हजारो प्रश्न निर्माण केले आहेत. या सामाजिक प्रश्नांचे हे भान - संपादक*

*मी तुझ्या आरोग्यासाठी*
*कित्येक हॉटेलात प्याले रिते केले*
*मी तुझ्या आरोग्यासाठी*
*स्वत:च्या घरात दारू प्यायलो,*
*तुझ्या आरोग्यासाठी - असं म्हणत मी*
*इतका प्यायलो, इतका प्यायलो, की*
*माझ्या स्वत:च्याच आरोग्याचे*
*वाजले तीन - तेरा*

कुणा अनामिकाच्या या कवितेचा अर्थ जाणून न घेता लोक कळतं, पण वळत नाही या पद्धतीने वागतात.

एका डॉक्टरांनी काही व्यसनी माणसांसमोर एक प्रयोग केला. दोन बाटल्या घेतल्या. एकात पाणी आणि एकात अल्कोहोल घातले. नंतर त्यात गांडूळ सोडले. पाण्यात सोडलेले गांडूळ पोहत पोहत वर आले. पण अल्कोहोलमधे सोडलेल्या गांडूळाचे विघटन झाले. ते पाहून डॉक्टरांनी समोरील लोकांना विचारले, यातून तुम्हाला काय समजले. त्यातील एकाने उत्तर दिले, अल्कोहोल प्यायल्याने पोटात जंत होत नाहीत! अशी समजण्याची कुवत असेल तर माणूस व्यसनाधीन होणारच.

आजकाल धूम्रपान आणि मद्यपान ही प्रतिष्ठेची लक्षणे झाली आहेत. त्यासाठी अनेक सबबी सांगितल्या जातात. • आनंद व्यक्त करण्यासाठी •अतीव दु:ख • मजेसाठी • समस्यांचा विसर पडण्यासाठी • निराशावादी • विरंगुळा म्हणून • फॅशन म्हणून • इतरांना कंपनी म्हणून • कामधंद्यासाठी इत्यादी

या पद्धतीने जीवन जगणाऱ्यांच्या लक्षात एक गोष्ट येत नाही, की याचेच अनुकरण पुढची पिढी करत आहे. त्यांची विचारशक्ती खुंटलेली आहे. त्यांचा सोबती आहे टी.व्ही. सतत सोबतीला असलेली विविध चॅनल्स. मद्यपानासंबंधी जाहिराती पाहिल्यावर त्यांना वाटते, हेच सुख, हीच चैन, हेच स्वर्गीय सुख. म्हणून गुन्हेगारी वाढली आहे.

मद्यपानामुळे माणूस धरबंद सोडून स्वत:च्या अवगुणांचे बीभत्स प्रदर्शन करतो.

सुखदायक क्षणांचा मला मनापासून आस्वाद घ्यायचा असतो. म्हणून मी मद्यपान करायचे टाळते

- लेडी ॲस्टर

व्यसनांमुळे समाजातील नैतिक मूल्ये कमी झाली आहेत. बीभत्सपणा वाढलाय. अश्लीलतेला खतपाणी मिळतंय. ३१ डिसेंबरच्या नावाखाली बारवाले रात्ररात्र बार चालू ठेवण्याचा परवाना मिळवतात. स्वत:च्या चैनीसाठी मुलांना सिगारेट, मद्य आणायला सांगितले जाते. त्यांना हे समजत नाही याची चव मुले घेतल्याशिवाय राहतील का?

काही घरात तर असे विचार आहेत की मूल १८ वर्षांचे झाल्यावर त्या वाढदिवसाला त्याला पहिला पेग ऑफर करतो. असे केल्यास १८ वर्षांनंतर आपली सामाजिक कर्तव्ये काय आहेत याची जाणीवच राहात नाही. असा एक बिघडलेला मुलगा आणखी काहींना चव देऊन त्याच मार्गावर नेऊन ठेवतो.

रामदासांची वचने पाळतो कोण ?

***पेरीले जैसे उगवते, बोलला सारखे उत्तर येते ।***

एखाद्या उपभोग्य वस्तूच्या पूर्णपणे आहारी जाणे म्हणजेच व्यसन. सर्वसाधारणपणे व्यसने म्हणजे काय ते पाहिले. पण व्यसन आणखी इतर गोष्टींचे असू शकते आणि कोणतेही व्यसन हे हानिकारकच होय. 'व्यसन' या शब्दाचाच अर्थ सर्वनाश; मग तो कसाही ।

माणूस प्रथम दहा रुपयाची नोट मिळवण्यासाठी धडपडतो. ती मिळाली की शंभर, हजार; अखेर हाव संपत नाही. त्यासाठी अफाट कष्ट. त्यातून विसर पडायला चुकीचे मार्ग. पैसे मिळवायचे व्यसन, त्याबरोबर येणाऱ्या समस्या सहन न झाल्याने ते विसरण्यासाठी व्यसन. यासाठी हवा संयम, लगाम, अंकुश. ज्याला कुठे थांबावं हेच कळत नाही तो व्यसनाधीन.

अतिआहार, अतिनिद्रा अशा अनेक गोष्टी व्यसनात येतात. 'अति सर्वत्र वर्ज्ययेत' असे संस्कार मुलांच्या मनावर कोरले गेले पाहिजेत.

आई-वडील, गुरू जर व्यसनी असतील तर सर्वत्र अंधारच! प्रसारमाध्यमांनी याबाबत आवाज उठवायला हवा. पूर्वीचा समाज हा श्रमावर जगणारा होता. आता दरडोई उत्पन्न वाढलंय. 'कष्टाविणा नाही फळ' याउलट आता सगळ्यांना 'कमीतकमी कष्टात फळेच फळे' याचा मोह सुटलाय. पैसे गुंतवण्याच्या झटपट दुप्पट होण्याच्या मोहात माणूस अडकत आहे.



मादक पदार्थ हा अर्थव्यवस्थेचा मोठा घटक बनलाय. हिंसक गुन्हेगारी वाढलीय. व्यसन वैयक्तिक न राहता त्यात शासनाचेही उत्पन्न आहे. यात अगणित कुटुंबांची हानी होत आहे. चोरून व्यसन करणे म्हणजे आपल्याच माणसांची फसवणूक करणे. यात माणसाच्या नैतिकतेचा ऱ्हास होतो.

व्यसनांचा अर्थव्यवहार हे एक मानवाने आमंत्रित केलेले संकटच आहे.

**व्यसनांची अनेक कारणे आहेत-**

अनुवंशिकता, श्रीमंती, गरिबी, रिकामपणा जीवनपद्धती, मित्रपरिवार, अपयश, नैराश्य, गैरमार्गाने येणारा पैसा, व्यसनाच्या वस्तू सहज उपलब्ध असणे.

अशा बहुतेक व्यसनी पुरुषांमुळे स्त्रिया मात्र आयुष्यभर दुःख भोगतात. व्यसनांमुळे माणूस मानसिक कमकुवत होतोच, पण शारीरिकही कमकुवत होतो. या व्यसनाधीन माणसांमुळे सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत. अपघात, खून, भांडणे, आत्महत्या, बलात्कार घरातील मारहाण शिवाय व्यक्तीचा स्वतःला शारीरिक त्रास.

दारूमुळे अपघात आपण वरचेवर वाचतो. लोकांना कोणत्या प्रतीची दारू प्यायची यात प्रतिष्ठा वाटते. पण याचे उत्तर एका कामवाल्या बाईने आपल्या मालकिणीला दिले ते असे-

ताई, तुमच्या माझ्यात काय फरक आहे? तुम्ही पैसे कमावता - मी पण कमावते. तुम्हाला घरी कसलेच अधिकार नाहीत - मलाही नाहीत. 'तुमचा नवरा दारू पितो - माझाही पितो, तो भारीची पितो - हा हातभट्टीची पितो. त्यांना तोल सावरता येत नाही. यालाही येत नाही. ते तुम्हाला शिव्या घालतात, शिव्या मलाही बसतात. ते मुलांना वेळ देत नाहीत - माझाही नवरा वेळ देत नाही. फरक एवढाच आहे की माझा नवरा मला हाताने

किंवा वस्तूने मारझोड करतो. तुमचा तुम्हाला शब्दांनी मारतो. शेवटी दोघांच्या डोळ्याला पदरच. पण आमचं दुःख समाजासमोर उघड पडतं आणि तुम्ही आतल्या आत रडता.'

दारूबंदीची चळवळ केली पाहिजे, कारण यावरच स्थानिक गुन्हेगारी आणि भ्रष्टाचार पोसला जातो. याच्याच आधारे अंधार पडल्यावर सर्व बार भरायला लागतात.

व्यसनात एखादी गोष्ट प्राप्त करण्यासाठी माणसे कोणत्याही थराला पोहोचतात.

व्यसनमुक्त होण्यासाठी आणि व्यसनाधीन होणारच नाही याची काळजी घ्यावी.

मादक पदार्थांचा पुरवठाच त्या व्यक्तीला होता कामा नये. जीवनात पोकळी निर्माण झाली असे वाटल्यास पूजा, भजन, गाणी, कार्यक्रमात मन रमवण्याचा प्रयत्न करावा.

सतत लागणारी औषधे हे पण एक व्यसनच आहे. शेवटी शरीराला त्याची सवयच होऊन जाते. त्याशिवाय तुमचे शरीर साथच देत नाही.

यासाठी योगासने, ब्रह्मविद्या, ॐ, गायत्री यांचे महत्त्व पुढच्या पिढीला समजावून दिले पाहिजे. घोड्याला लगाम, हत्तीला अंकुश नसेल तर काय होईल. त्याप्रमाणे स्वतःच स्वतःचे गुरू व्हा. पंचेंद्रियांवर विजय मिळवण्याचा प्रयत्न करा. देवळात जाताना दारात कासव असते. त्यावर पाय दिला तर ते काय करेल ? तर चार पाय आणि डोके आत ओढून घेईल तसे तुम्ही तुमच्या पंचेंद्रियांवर विजय मिळवा नाहीतर या समाजाचा ऱ्हास व्हायला वेळ लागणार नाही. ही पुढची पिढी मातीचा गोळा आहे. याला आपण आकार देणार आहोत. त्याला जर या दुष्परिणामांची जाणीव झाली तर हा समाज व्यसनाधीन न होता नक्कीच म्हणेल-

*मज नकोत अश्रू, घाम हवा ।*

या व्यसनांच्या खोल खोल दरीत जाताना पाश्चात्यांचे अनुकरण करताना आपण आपल्याच संस्कृतीशी बेइमान होत आहोत. गीतेवर हात ठेवून शपथ घेता येते. गीतेची पूजा करता येते. पण त्यातील एकही गोष्ट आचरणात आणताना आपल्याला त्रास होतो.

या व्यसनांमुळे समाजाला ग्लानी आली आहे. ही सुंदर सृष्टी, सामाजिक जीवन आपण वाईट करत आहोत. आपल्यालाच बदलायचे आहे आणि हे आपलेच सामाजिक कर्तव्य आहे. सगळीकडे अधर्म माजतोय. जर आपणात संयम नसेल तर भगवंतांनी सांगितल्याप्रमाणे घडेल असे वाटते -

यदा यदा ही धर्मस्य

ग्लानि भवति भारत् ।

अभ्युथ्यानं अधर्मस्य् ।

संभवामि युगे युगे ॥

शुभं भवतु ।

सौ. वंदना संदीप प्रसादे

५०३, सिद्धांत टॉवर, भास्कर कॉलनी

ठाणे (प.) ४०० ६०१.

दूरध्वनी : २५४००६५२

परिचय

# फूल मेंदीचे

लेखक - दत्ता जाधव, डोंबिवली
गाथा प्रकाशन, २००३
पृ. ६० मूल्य : रु. ६०/-
मुखपृष्ठ - श्री. सतीश भावसार

गझल हा अवघड काव्यप्रकार. एखाद्याला जर तो जमला तर त्याच्या गझला रसिकांच्या जीवनात वेगळाच अर्थ निर्माण करून जातात. ख्यातनाम गझलकारांच्या कितीतरी गझला माझ्या या म्हणण्यातील तथ्य जाणवून देतील. गझल चांगली जमायची असेल तर रचना प्रकारावर प्रभुत्व तर हवंच, पण काव्यप्रतिभाही तितकीच तरल, संवेदनक्षम असायला हवी.

असाच एक गझलसंग्रह अचानक वाचनात आला. या गझलकाराचा नम्रपणा असा की, 'गझल या काव्यप्रकाराचं शास्त्र मात्र तितकसं माहीत नाही, पण अशाप्रकारे काव्यरचना केली की तिला गझल म्हणतात. एवढ्याशा खुणांवरून स्वर्ग गाठण्याचा हा प्रयत्न !' स्वत:च्या कवितेबद्दल इतकी स्पष्ट दृष्टी असणारे हे गझलकार फार ख्यातकीर्त नाहीत हे खरे, पण त्यांच्या या गझलांतून येणारी अनुभूती, मिळणारा आनंद बावनकशी आहे. त्यांनीच कबुली दिल्याप्रमाणे सर्वच गझल अपेक्षित उंची गाठू शकल्या नाहीत, पण बऱ्याच गझला, चांगले काव्य, चांगली गझल वाचल्याचे समाधान देतात.

हे गझलकार आहेत, दत्ता जाधव आणि त्यांच्या पहिल्यावहिल्या संग्रहाचं नाव आहे, 'फूल मंदीचे'.

संग्रहात एकूण ६९ गझला आहेत. काही गझला सामाजिक आशय व्यक्त करणाऱ्या, काही प्रेमभावना व्यक्त करणाऱ्या, काही निरीक्षणे नोंदणाऱ्या, तर काही जीवनातील त्रिवार सत्य अनुभवांना शब्दरूप देणाऱ्या आहेत.

*बोलून गोड केले, कंगाल मज तवांनी*
*निर्धार गनीमांचा आधार कसा मानू ? (पृ. ३)*
किंवा
*चेहरे आता जरासे, ओळखू मी लागलो ।*
*पाहता लांबून मजला, हे लपाया लागले ॥ (पृ. १९)*
किंवा
*आत्महत्या रोज करतो रामशास्त्री का बरे ?*
*प्रश्न साधे संपणारे, क्लिष्ट हे झाले इथे (पृ. ५८)*

या सामाजिक आशयांच्या गझला मनाला विलक्षण व्यथित करतात. सामाजिक आशयाबरोबरच सामाजिक निरीक्षणांतून व्यथित होऊन कवी जेव्हा

**कीर्तनी रंगून गेले संत जेथे**
**मद्यप्यांचा पाहिला मी बार तेथे (पृ. ५७)**
किंवा
**एकांतवास माझा, मी सोबतीस माझ्या ।**
**त्या एकल्यापणीही मी एकटाच आहे ॥ (पृ. ३७)**

अशा ओळींतून जाता जाता कवी जीवनाची तत्त्वे, अपरिहार्य सत्ये शब्दात सहज व्यक्त करतो.

एकीकडे कवीचे हे रूप, तर दुसरीकडे भावविभोर होऊन प्रीतीच्या क्षणांचे हळुवार प्रकरणदेखील कवी करतो. यातील या गझल तर फारच सुरेख आहेत. पृ. १७ वरील 'का म्हणाली' ही संपूर्ण गझल वाचून पाहण्यासारखी आहे. त्यातील पुढील ओळी देण्याचा मोह आवरता येत नाही.

*कोठला विश्वास आता, श्वास का घ्यावे तरी मी ? ।*
*जीव लावू एकमेका, का म्हणाली तूच तेव्हा ? ॥*

दत्ता जाधव हे फारसे परिचित नाव नसले तरी गझलच्या प्रदेशात आपली म्हणावी अशी वाट त्यांनी या काव्यसंग्रहातून नक्कीच निर्माण केली आहे. शेवटच्या पानावर कवीचा परिचय, तर मलपृष्ठावर फोटो आहे.

कविता, त्यातही मराठी कविता वाचणारे आज कमी आहेत. (रचणारे पुष्कळ असले तरी !) याचे कारण शब्दांची कारागिरी करीत प्रथितयशांच्या मांदियाळीत मिरवणारे फार. या पार्श्वभूमीवर हा कवी वाचावा वाटला, याच्या रचनेत चमक जाणवली, कारण कवीला प्रतिभेचे वरदान आहे.

प्रा. मोहन पाठक

परिचय

## सांगे गीता

लेखिका - आशा भिडे, ठाणे

'सांगे गीता' हा गीतेच्या प्रत्येक अध्यायावर निरुपण असणारा श्रीमती आशा भिडे यांचा ग्रंथ ! ठाण्यातील विद्याप्रसारक मंडळाच्या 'व्ही.पी.एम्. दिशा' या नियतकालिकातून सलग अठरा महिने श्रीमती आशा भिडे यांनी गीतेतील प्रत्येक अध्यायावर, अध्यायातील तत्त्वज्ञान सुलभ करून लिहिलेल्या लेखमालेचे हे ग्रंथरूप. सौ. मालती बाई नवाथे ट्रस्ट 'सद्धर्म प्रकाशना'ने अलीकडेच गीतेवरील सदर ग्रंथ प्रकाशित केला.

गीता हा असा अद्भुत ग्रंथ आहे की, त्यातील विचारांची मोहिनी मोठमोठ्या लेखकांना पडली. याचा स्वाभाविक परिणाम म्हणजे गीतेवर असंख्य पुस्तके निर्माण झाली. गीतेतील तत्त्वज्ञान व जीवनविषयक अनुभव इतके समृद्ध आहेत की, त्याचा निरनिराळ्या लेखकांनी निरनिराळ्या पद्धतींनी अन्वयार्थ लावला. श्रीमती आशा भिडे यांचे सदर लेखनही या गीतासाहित्यातील महत्त्वाची भर म्हणावी लागेल.

सदर लेख 'दिशा'तून देत असताना संपादक म्हणून अनेकांचे माझ्याशी या लेखासंबंधी बोलणे होई. संस्कृतचा अभ्यास असणाऱ्या मान्यवरांनीही जेव्हा या लेखांबद्दल उत्तम दर्जा असल्याचे मत व्यक्त केले तेव्हा श्रीमती भिडे यांचे लेख प्रकाशित करण्यामागील आपल्या भूमिकेचे सार्थक झाले असे मला वाटत राहिले.

ग्रंथाची जी ठळक वैशिष्ट्ये नोंदलीच पाहिजेत ती म्हणजे, या ग्रंथाच्या निर्मितीचा दर्जा व मुखपृष्ठावरील सुंदर छायाचित्र, प्रत्येक अध्यायाच्या सुरुवातीला श्रीमती आशा भिडे यांनी त्या अध्यायावर केलेली कविता हाही एक विशेष आहे. या कविता ठाण्यातील 'दै. सन्मित्र'मधून आधी प्रकाशित झाल्या होत्या. या कविता अतिशय सोप्या भाषेत असणारा काव्याविष्कार आहे. उदा.

*अल्प बुद्धीच्या अभिलाषेचे अल्पच असते फल*
*ते न जाणती अव्यक्ताला जाणती न स्थानकाल*

(पृ. १७)

किंवा

*नच कोणी माझा आवडता*
*नसे कुणी माझा नावडता*
*भावभक्तीने भजे त्याचा घेई सखा मी जाण* (पृ. १०)

अशा साध्या, सरळ शब्दांमुळे कवितेतून सध्याचे सार वाचकांपर्यंत पोहचविले आहे. पूज्य आचार्य विनोबा भावेंनी गीताईतून समश्लोकी भाषांतर केले. त्यानंतरही काहीजणांनी असे भाषांतर केले. परंतु अध्यायाचे सार सांगणाऱ्या कविता आजवर वाचनात नव्हत्या. म्हणूनच या कविता हा या ग्रंथाचा विशेष आहे.

संस्कृत आणि हिंदी भाषांचे व्यासंगी अभ्यासक डॉ. मो.दि. पराडकर यांची या ग्रंथाला असणारी प्रस्तावनाही विशेष उल्लेखनीय आहे. पराडकर सरांनी प्रस्तावनेत शेवटी म्हटले आहे, 'तात्पर्य, गीतेतल्या प्रत्येक अध्यायाच्या विवेचनात गीतेच्या प्रतिप्रादित आशयाचे स्पष्टीकरण करण्यात लेखिकेने यश मिळवले.'

हे गीताविषयक लेख आमच्या 'दिशा'तून संपादित करताना अत्यंत महत्त्वाची वाक्ये, शब्द, संकल्पना मी अधोरेखित करीत होतो. हेतू असा की, या ओळींचा विशेष व वेगळा विचार वाचकाने करावा. या ग्रंथात हे अधोरेखन तसेच ठेवले आहे, हे महत्त्वाचे.

श्रीमती भिडे यांच्या या लेखाचा एक उत्तम भाग म्हणजे अनेक ग्रंथांचे संदर्भ त्यांनी दिलेले आहेत.

पृ. २२८ वर त्या संदर्भ ग्रंथांची यादीही त्यांनी दिली आहे. मात्र ही यादी पाहताना अलीकडे गीतेवर आलेली डॉ. रवीन थत्तेसारख्या लेखकांची पुस्तके पाहिली नसल्याचे जाणवते. शिवाय परिशिष्टात कुरुक्षेत्राचे ठिकाण दाखविणारा नकाशा, गीतेतील तत्त्वज्ञानात्मक संकल्पनांची सूची हेही घेता येणे शक्य होते. मलपृष्ठावर लेखिकेचा परिचय दिला आहे.

एकंदरीने विचार करता प्रत्येक गीताप्रेमी वाचकाच्या संग्रहात व शैक्षणिक ग्रंथालयांमध्ये हा ग्रंथ असायलाच हवा, हे जाणवते.

- प्रा. मोहन पाठक,
कार्यकारी संपादक, दिशा

# केवळ कृत्रिम श्वासनलिका लावून तलावांना गतवैभव प्राप्त करून देता येईल ?

'तलावांचे शहर' म्हणून प्रसिद्ध असलेल्या ठाणे शहरातील तलावांसंबंधी गेली अनेक वर्षे वेगवेगळ्या क्षेत्रांतील लोकांनी वेळोवेळी आपल्या भावना आणि आपली मते व्यक्त केली आहेत. मी स्वतः त्यावर सातत्याने लिहीत आलो आहे. तसेच चित्रवाहिन्यांच्या माध्यमातून या तलावांचे आजचे स्वरूप लोकांपुढे मांडीत आलो आहे.

या सर्वांचे लिखाण, वक्तृत्व आणि इतर माध्यमांतून एक गोष्ट सातत्याने लोकांच्या नजरेसमोर येत राहिली. ती म्हणजे, या तलावांच्या आजच्या दुरावस्थेबद्दल सगळ्यांच्या मनात असलेली खिन्नता, कांहीतरी करीत राहण्यासंबंधीची इच्छा आणि या तलावांचे भूतकालीन वैभव त्यांना पुनः प्राप्त करून देण्याची मनीषा.

वेगवेगळ्या स्तरावर लोकांचे प्रतिनिधित्व करीत राहणारे लोकप्रतिनिधी आणि शहराच्या नागरी समस्यांचे निराकरण करीत राहून नागरिकांचे जीवन सुसह्य करण्यासाठी सतत कार्यरत असलेल्या नागरी प्रशासनाच्या भावना आणि तळमळ यापेक्षा वेगळ्या असल्याचे काही कारणच नव्हते. त्यासाठी सुरुवातीला निदान काही तलावांच्या बाबतीत काम असेना, परंतु त्यांचे शुद्धीकरण, स्वच्छीकरण आणि सौंदर्यीकरणासाठी केंद्र शासनाकडून काही अर्थसहाय्य मिळविता आले तर मिळवावे, यासाठी ठाणे शहरातच लहानाचे मोठे झालेले आणि गेली पंधरा वर्षे ठाणे मतदार संघातून लोकसभेत नागरिकांचे प्रतिनिधित्व करीत असलेले खासदार श्री. प्रकाश परांजपे यांनी आणि ठाणे महानगरपालिका प्रशासनाने अथक प्रयत्न केले. त्यांना या कार्यांत मिळालेल्या यशाची माहिती वेळोवेळी वृत्तपत्रांतून येत राहिली आहे. त्यांनी केलेल्या या प्रयत्नांसाठी आणि त्यांना लाभलेल्या यशासाठी त्यांचे अभिनंदन करणे आवश्यक आहे. अभिनंदन एवढ्यासाठी, अलीकडे सर्वसाधारणपणे निवडून आल्यानंतर लोकप्रतिनिधी आणि खुर्चीत बसल्यानंतर प्रशासकीय अधिकारी आपण त्या जागेवर कशासाठी आणि कोणासाठी आलो तेच विसरतात. यांनी त्याचे भान ठेवले, यासाठी त्यांचे कौतुक करायला हवे.

या प्रयत्नांचे फलित म्हणून ठाणे शहरातील महानगरपालिकेच्या १९९८ सालच्या अहवालात उल्लेख असलेल्या तीस तलावांपैकी दहा तलावांचे शुद्धीकरण आणि सुशोभीकरणासाठी केंद्राने एक कोटी शाऐंशी लाख (रु. १,८६,००,०००/-) रुपयांचे अर्थसहाय्य देऊ केले आहे. या दहा तलावांमध्ये उपवन, खाळे, जेल, मखमली, सिद्धेश्वर, कोलबाड, ब्रह्माळा, खारीगाव, हरियाली (ठाणे-पूर्व) आणि कोलशेत या दहा तलावांचा समावेश आहे.

याविषयी महानगरपालिकेकडून वेळोवेळी प्रसृत करण्यात आलेल्या माहितीचा थोडक्यात गोषवारा असा:- 'सदर तलावांचे पाणी शुद्ध करण्यासाठी जैविक तंत्रज्ञानाचा आधार घेण्यात येणार आहे. या पद्धतीत पाण्यात जागोजागी प्राणवायू सोडला जाऊन पाण्यातील जैविक घटकांची वाढ होईल असे प्रयत्न केले जातात. त्यामुळे पाणी शुद्ध होण्यास मदत होते. त्यासाठी निवड करण्यात आलेल्या दहा तलावांपैकी प्रत्येकी दोन, दोन तलावांत अशी प्रक्रिया करण्यासाठी केळकर-वझे महाविद्यालय आणि चांदीभाई महाविद्यालयातील जैविक विभागातील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचा उपयोग करून घेण्यात येणार आहे. इतर तलावांच्या बाबतीत मात्र हेच काम कांही बहुराष्ट्रीय कंपन्या अथवा त्यांच्या भारतीय प्रतिनिधींना कंत्राट देऊन करण्यात येणार आहे. त्यासाठीचा खर्च महानगरपालिका आपल्याला

केंद्राकडून मिळणाऱ्या अर्थसहाय्यातून करणार आहे. हे अर्थसहाय्य पाण्याच्या शुद्धीकरणाप्रमाणेच तलावांच्या परिसराचे सुशोभीकरण करण्यासाठी देखील देण्यात येणार आहे. सुशोभीकरणात वेगवेगळ्या तलावांच्या संदर्भात नौकानयन, कारंजी, धावपट्टया ई. गोष्टींचा अंतर्भाव असणार आहे. कंत्राटदाराकडून हे काम व्यवस्थित होत आहे की नाही हे बघण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने एक देखरेख समितीचे गठण केले असून त्या समितीवर सेवाभावी संस्थांच्या प्रतिनिधींना देखील घेण्यात आले आहे. कंत्राटदार आणि महाविद्यालये या तंत्रज्ञानाचा वापर करून तलावांचे पाणी शुद्ध करणार आहेत त्यासाठी दोन वर्षांची हमी असणार आहे. अशा पद्धतीने ह्या सर्व तलावांचे शुद्धीकरण आणि सौंदर्यीकरणावर पैसा खर्च करून झाल्यानंतर तो तलाव देखभालीसाठी खाजगी कंत्राटदारांना पंचवीस वर्षांच्या कराराने भाडेपट्टीवर देण्यासाठी स्थायी समितीने मंजुरी देण्यात आली आहे."

सदर माहिती म.न.पा. प्रशासनाकडून वेळोवेळी प्रसृत करण्यात आलेल्या निवेदनांवर आधारित आहे.

तलावांच्या संदर्भात महानगरपालिका करीत असलेल्या या प्रयत्नांचे कौतुक करीत असतांना खालील प्रश्नांची उत्तरे देखील महानगरपालिका प्रशासनाकडून मिळणे आवश्यक आहे असे मला वाटते.

**१) तलाव परिसरातील अस्वच्छता :**

तलावाचे पाणी आणि परिसर अस्वच्छ होण्याची कारणे - प्रत्येक तलावागणिक वेगवेगळी आहेत. त्यांत तलावांमध्ये मलमूत्र विसर्जनापासून, कपडे आणि वाहने धुणे, रासानिक द्रव्ये सोडणे, प्लॅस्टिकच्या पिशव्यांमधून आणि एरवीदेखील निर्माल्य टाकीत राहणे, प्लॅस्टर ऑफ पॅरिस आणि विषारी रंगमिश्रीत मूर्त्यांचे विसर्जन आदी सगळ्याच गोष्टींचा अंतर्भाव होतो. या सगळ्याच गोष्टींमुळे पाणी कमी-अधिक प्रमाणात अस्वच्छ आणि प्रदूषित होत रहाते. अनेक तलावांमध्ये प्रचंड प्रमाणात पुन्हा पुन्हा येत राहणारे शेवाळ आणि पाणवनस्पती आहेत. अशा सगळ्या घटकांचा विचार करून मग त्यांवर आवश्यक असे तंत्रज्ञान वापरणे आवश्यक आहे की या सर्वच घटकांमुळे होत राहणारी घाण आणि प्रदूषणावर जैविक तंत्रज्ञानाचा वापर हा एकच उतारा आहे. जाणकारांकडून यावर मिळणारे उत्तर नाकारार्थी आहे.

**२) हमी काळानंतर तलाव स्वच्छ राहतील याची शक्यता किती ?**

तलावाचे पाणी जैविक तंत्रज्ञान आणि प्राणवायू मिश्रणाची प्रक्रिया वापरून स्वच्छ ठेवणे म्हणजे एखाद्या हृदयरोग्याला नळ्या लावून कृत्रिम श्वासोच्छ्वासावर जिवंत ठेवण्यासारखे आहे. इतर उपाय नाही करण्यात आले आणि त्याच्या या नळ्या काढण्यात आल्या तर परिस्थिती पूर्ववतच होणार आहे. त्यासाठी मुळात तलावांचे पाणी अस्वच्छ आणि प्रदूषित करणारे घटक आणि कारणांचा बंदोबस्त होणे आवश्यक आहे. तसे न करता हमी कालावधीपुरताच या तंत्रज्ञानाचा उपयोग केला तर मात्र आज होणार सर्व खर्च हा अक्षरशः पाण्यातच जाणार आहे. तलाव परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी आज जैविक तंत्रज्ञान नव्हे, तर शिटी-काठीधारी गणवेशातील दक्ष पहारेकऱ्यांची खास आवश्यकता आहे. त्याचबरोबर तलावांच्या संदर्भात आपली जबाबदारी ओळखून त्याप्रमाणे वागणारे नागरिक घडविण्याची आवश्यकता आहे. अन्यथा अशा तऱ्हेने खर्च करीत राहणे म्हणजे नागरिकांनी आपण होऊन स्वतःच्या पायावर धोंडा मारीत राहण्यासारखे होणार आहे.

**३) तंत्रज्ञानाची परिमाणे अजून निश्चित नाहीत**

ज्या तलावांचे पाणी शुद्ध करण्यासाठी जैविक तंत्रज्ञान वापरावयाचे ती परिमाणे ठरविण्यासाठी आता अशा

तलावातील पाण्याचे नमुने गोळा करण्यास सुरुवात झाली आहे असे कळते. खरे म्हणजे कुठले आणि कोणाचे तंत्रज्ञान का वापरावयाचे हे ठरविण्याआधीच या गोष्टींचा विचार व्हायला हवा होता. नाही का ?

### ४) तलावातील गाळाचा उपसा

तलावातील गाळाचा उपसा करण्यावरदेखील फार मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च होणार असल्याचे कळते. खरे म्हणजे असा गाळ काढणे आवश्यक आहे. तसेच तो पुन्हा होत राहणार नाही हे बघणेदेखील आवश्यक आहे. तसेच असा उपसा तलावातील पाण्याची पातळी कमी झालेली असताना मार्च - एप्रिल - मे या महिन्यांमध्ये करणे आवश्यक आणि सयुक्तिक असते. मात्र रायलादेवी तलाव परिसरात असा उपसा करण्याचे नाटक सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यातच करण्यात आले ! त्या उपश्यामध्ये गाळ किती निघाला ते ठाऊक नाही. मात्र त्या तलावात असलेल्या दुर्लभ जातीच्या कमळफुलांना आणि बिल्वदलांना उखडून टाकण्यात आले ! त्यामुळे त्या परिसरातील कीटकांपासून - पाणपक्ष्यांपर्यंतच्या जैविक सृष्टीची साखळीच नष्ट झाली! हे सर्व झाले तलाव स्वच्छीकरणाच्या नावाखाली ! कमळ हे आपले राष्ट्रीय फूल आहे. त्याचा असा अवमान आणि नासाडी करणे योग्य नाही. हे म.न.पा. प्रशासनाच्या लक्षात वारंवार आणूनदेखील त्यांच्याकडून हा विध्वंस थांबू शकला नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. बरे तर बरे; यावेळी काढण्यात आलेला गाळ तसाच तलावाच्या भिंतीलगत उपसून ठेवलेला होता. तो पुन्हा तलावातच कोसळला. त्यामुळे मूठभर गाळ काढण्यासाठी गाडीभर पैसे पाण्यात ओतण्यात आला आले, असे कोणी म्हटले तर ते गैर ठरेल काय? यापुढील कामात तरी निदान अशा त्रुटी राहत आहेत हे कोणी तरी बघणे आवश्यक आहे. म.न.पा.ने गठित केलेली पाठपुरावा समिती, सेवाभावी संस्था आणि पत्रकारांनी अशा प्रश्नांना वेळोवेळी वाचा फोडीत राहणे आवश्यक ठरणार आहे.

### ५) इतर तलावांचे काय?

हे सर्व मोजक्या दहा तलावांच्या संदर्भात झाले. (त्यातील हरियाली (ठाणे-पूर्व), ब्रह्माळा, ई. अनेक तलावांची अवस्था आणि आकार वेगवेगळ्या कारणांमुळे डबक्यासारखे झालेले आहेत. तरी त्यांच्या शुद्धीकरण आणि सौंदर्यीकरणावर लाखो रुपये खर्च होणार आहेत. कारण ते पैसे केंद्राकडून मिळणार आहेत ! केंद्रालादेखील कदाचित् ते जागतिक बँकेकडून मिळणार असावेत. बहुधा त्यातील बराच भाग ३१ मार्च रोजी संपणाऱ्या चालू वर्षाच्या अखेरीपूर्वीच खर्च करायचा असेल. कारण आता तो सर्व स्तरावरील आपल्या प्रशासनाचा एक शिरस्ताच झालेला आहे. होवो बापडा खर्च ! नागरिकांना काय त्याचे देणे-घेणे! आपला देश, ठाणे म.न.पा. आणि ठाण्यातील नागरिकदेखील खूप,खूप श्रीमंत आहेत. संपत्तीने तसेच मनाने ! ते काही अशा खर्चाचे फारसे मनाला लावून घेणार नाहीत.

पण उर्वरित वीस तलावांचे काय? म.न.पा.ने त्यासंबंधीची आपली भूमिकादेखील आजच स्पष्ट करणे आवश्यक आहे. कारण या तलावांचे रक्षण, स्वच्छीकरण आणि सौंदर्यीकरणासाठी केंद्राने अजून काहीही अर्थसहाय्य मंजूर केलेले नाही. मग ठाणे म.न.पा.त्यांच्या बाबतीत काही करणार आहे की नाही? की ते अजून पुरेसे अस्वच्छ झालेले नाहीत असे म.न.पा.च्या पाहणीत आले आहे? की ते तलाव आज जागेवरच नाहीत? असल्यास भविष्यात त्यांच्यासाठी या बहुप्रांतीय माणसांनी गजबजलेल्या शहरात काही स्थान असणार आहे काय? की ते बांधकाम व्यावसायिक अथवा अनधिकृत वस्त्यांच्या अधाशीपणाचे बळी होणार आहेत ?

याच दहा तलावांच्या संदर्भात रविवार, दि. २५ मेच्या 'दै. लोकमत'मध्ये प्रसिद्ध झालेली बातमी या सर्व कारवाईस वेगळाच आयाम प्राप्त करून देते. अर्थात हा प्रत्येकाचा तिकडे बघण्याचा दृष्टिकोन कसा आहे, याचा प्रश्न आहे. शीर्षकासहितची बातमी अशी आहे -

''महापालिकेने नऊ तलाव भाड्याने दिले''

''शहरातील तलावांना गतवैभव मिळवून देण्यासाठी अखेर ठाणे महापालिकेने खासगीकरणाचा मार्ग पत्करला आहे. पहिल्या टप्प्यात सात तलाव २५ वर्षांच्या करारावर भाड्याने देण्याला स्थायी समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. सर्व तलावांचे मिळून १० लाख सहा हजार रुपये वार्षिक भाडे महापालिकेला मिळणार आहे. रायलादेवी तलावाचे सर्वाधिक सहा लाख ६५ हजार रुपये भाडे ठेवण्यात आले आहे. हे तलाव २५ वर्षांच्या करारावर देण्यात आले असून तलावाची निगा, देखभाल आणि सुशोभीकरणाची जबाबदारी ठेकेदाराची राहणार आहे.''

एखाद्या शहरातील तलाव अशा पद्धतीने देखभालीसाठी दीर्घ मुदतीच्या करारपट्टीवर खाजगी क्षेत्राकडे द्यावे की नाही, हा तात्त्विक तसेच व्यावहारिक मतभेदाचा मुद्दा होऊ शकतो. एक मात्र खरे की, ठाणे शहरातील मासुंदा तलाव देखभालीसाठी कंत्राटदाराकडे दिल्यानंतर तो परिसर आधीपेक्षा अस्वच्छ झालेला नाही की त्या परिसरात हिंडण्याच्या नागरिकांच्या कुठल्याही हक्कावर गदा आली आहे, असे वाटत नाही.

पण मग म.ना.पा. अस्तित्वात असण्याचे प्रयोजनच काय? एकदम मोठ्या प्रमाणावर नागरिकांच्या हिताकडे लक्ष देण्यासाठी म.न.पा.वर लोकप्रतिनिधी का निवडून देत राहायचे? त्यांच्या दिमतीस भरपूर अधिकार असलेले प्रशिक्षित प्रशासन कशासाठी देत राहायचे?

आणि नागरिकांचे कार्य तरी कार्य दिवसेंदिवस आपला परिसर, त्या परिसरातील तलाव, नद्या, नाले, खाड्या प्रदूषित आणि अस्वच्छ करीत राहणे आणि स्वच्छ करण्यासाठी अनमोल साधनसंपत्तीचा चुराडा करीत राहणे एवढेच आहे?

कोणालाच कशी याची खंत वाटेनाशी झाली आहे? या देशातील युवा पिढीने यापुढे इथे राहू नये अशाच पद्धतीने आजची कर्ती पिढी का वागते आहे?

या सर्व प्रश्नांची उत्तरे कोणाकडे आहेत? म्हटले तर कोणाकडेच नाहीत; अन् म्हटले तर आपल्यापैकी प्रत्येकाकडे आहेत !

शोधा म्हणजे सापडेल !

पुनम सिंगवी

**दिशा**

**नियमित**
**वाचा**

आपल्या प्रतिक्रिया
अवश्य कळवा.
संपादक, 'दिशा',
विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.
दूरध्वनी : २५४२ ६२७०

# परिसर वार्ता

## शालेय परिसर

इ. ८ वीच्या विद्यार्थ्यांना नृत्य, नाट्य, गायन, वादन, चित्रकला या ललितकलांची ओळख करून देणारा व विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारा 'चैत्रांगण' प्रकल्प.

आपल्या शालेय अभ्यासक्रमात 'कला' विषयाला महत्त्वाचे स्थान आहे. सध्याच्या अभ्यासक्रमात कला विषयांतर्गत ललितकलांचाही समावेश करण्यात आला आहे. ललितकलांबद्दल प्रख्यात लेखक जॉर्ज बर्नार्ड शॉ यांनी म्हटले आहे -

'शिक्षण विचारात थ्री एच ना महत्त्व आहे. हेड, हार्ट ॲण्ड हॅण्ड - बुद्धी, हृदय आणि हात.' बुद्धीविकासाचे शिक्षण घेताना त्याला हृदयशिक्षणाची जोड हवी आणि या दोन्हीलाही हातांमधील सृजनतेच्या शिक्षणाची जोड हवी, सोबत हवी. कारण आपले हात ही आपल्याला लाभलेली अमूल्य देणगी आहे. जाळपोळ, मोडतोड इ. विध्वंसक कृत्येही हातच करतात, तर चित्र, शिल्प, वादन इ. कलांचा आविष्कारही हातांकडूनच होतो म्हणून अशुभाकडून शुभाकडे झेपावणाऱ्या हातांचे शिक्षण महत्त्वाचे. यासाठी कला महत्त्वाची. कारण आपल्या भावभावनांना मोकळी वाट करून देणे हे कलेद्वारे साध्य होते. त्याचसाठी हा उपक्रम. या उपक्रमाबद्दल तुकारामांच्या शब्दांत एवढेच म्हणेन 'करविली तैसी केली खटपट, बरी का वाईट देव जाणे'

या उपक्रमांतर्गत पहिला कार्यक्रम दिनांक ४ जानेवारी २००४ रोजी पार पडला. या कार्यक्रमात बांद्रा स्कूल ऑफ आर्टचे माजी प्रिन्सिपॉल व 'ग्रेड परीक्षा चित्रकला' या पुस्तकाचे लेखक मा. श्री. द.रा. परुळेकर उपस्थित होते. शालेय शिक्षणातील किंबहुना आपल्या आयुष्यातील कलेचे महत्त्व विशद करून त्यांनी ग्रेड परीक्षेस असणाऱ्या सर्व विषयांबद्दल चर्चा केली. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. त्याचवेळेला फूल जसे त्याच्या कलाने फुलते तसेच मुलांना फुलू द्यावे व त्यासाठी पालकांनी सहकार्य करावे असे आवाहन उपस्थित पालकांना केले. आज माझा गणिताचा क्लास आहे म्हणून कलेच्या तासाला जात नाही असे म्हणणारेही विद्यार्थी आहेत. गणित येत नाही त्याचा सराव करतात, पण मला चित्र जमत नाही, म्हणून त्याचा सराव करताना फारसे कोणी दिसत नाही याबद्दल माझा पाल्य चित्रकलेचा सराव करत नाही अशी तक्रारही कोणताही पालक करत नाही.

शाळेतील मुलांचे एकंदर काम पाहून त्यांनी आनंद व्यक्त केला व या कामाची मला नोंद घेतलीच पाहिजे असेही ते म्हणाले. वयाच्या ८३ व्या वर्षी एखाद्या तरुणाला लाजवेल अशा उत्साहात त्यांनी मार्गदर्शन केले.

डॉ. बेडेकर विद्यामंदिर (मा.बि.) तील कलाशिक्षिका सौ. मंजिरी दांडेकर यांच्या कलात्मक मेणबत्त्यांचे प्रदर्शन नुकतेच रत्नागिरी येथे पार पडले.

## 'पॉलिस्पार्क २००३-२००४

'व्ही.पी.एम्. पॉलिटेक्निक' चा सांस्कृतिक महोत्सव अर्थात Cultural Fest 'Polyspark' 2003-2004 दिनांक २२ डिसेंबर २००३ रोजी सुरू झाला. बऱ्याच अभ्यासाच्या कालानंतर प्रत्येक विद्यार्थ्याला या दिवसाची प्रतीक्षा होती. शैक्षणिक वर्ष २००३-२००४ च्या या महोत्सवाच्या आयोजनासाठी खालील स्वयंसेवक निवडलेले होते.

General Secretary वैभव खेर (S.Y.I.E.)

Asst. General Secretary सिद्धांत भडगे (S.Y.EPS.)

हर्षद बंगेरा (S.Y.I.E.)

सागर जोरापूर (S.Y.I.S.)

पूजा पाटील (S.Y.I.S.)

अभिषेक नायर (S.Y.I.E.)

पद्मजा पोदार (S.Y.EPS.)

त्रिगुणी पत्की (F.Y.CO.)

तसेच स्वयंसेवकांच्या मार्गदर्शनासाठी प्रा. सौ. गुप्ते व प्रा. सौ. पाध्येसुद्धा होत्या.

२२ तारखेचा दिवस सर्व स्पर्धांच्या व कार्यक्रमांच्या आयोजनासाठी व 'Practice' साठी देण्यात आला होता.

२३ तारखेला 'Formal Day' होता. सर्व विद्यार्थी Formal कपडे घालून आले होते. या दिवशी डॉ. दिलीप जोशी यांचे 'Counselling Session' होते. डॉ. दिलीप जोशी हे मनोविकारतज्ज्ञ आहेत व विद्यार्थ्यांच्या अडचणींचे निर्मूलन करण्यासाठी त्यांना आमंत्रित केले होते. विद्यार्थ्यांच्या मानसिक अडचणी, खासगी समस्या व इतर समस्यांचे निराकरण त्यांनी सुचविले व हा कार्यक्रम सर्वांसाठी फारच लाभदायक ठरला.

२४ तारखेला 'Traditional Day' होता. विद्यार्थी विविध प्रकारचे पोशाख घालून आले होते. 'Best Traditional Dress' ची बक्षिसे खालील जणांना मिळाली.

प्रथम - श्रुती आजगेकर (F.Y.I.E.)

द्वितीय - संदीप पॉल (F.Y.CH.)

तसेच या दिवशी इतर बऱ्याच स्पर्धा होत्या. केशरचना स्पर्धेमध्ये सर्वांनी आपली केशभूषा सुंदररीत्या सजविली, खालील जणांना पारितोषिके मिळाली.

प्रथम - Boys - रोहन तळावलीकर ( F.Y.I.E.)

Girls - पूजा पाटील (S.Y.I.S.)

द्वितीय - Boys - नावीद शेख (S.Y.I.E.)

Girls - पल्लवी वारेकर (S.Y.EPS)

हस्ताक्षर स्पर्धेला विद्यार्थ्यांचा इतका प्रतिसाद होता की, सुंदर अक्षरांमधील उत्कृष्ट अक्षर निवडणे परीक्षकांना कठीण गेले. त्याची बक्षिसे अशी आहेत.

प्रथम - प्रियांका राणे (T.Y.I.F.)

द्वितीय - श्रद्धा दामले (F.Y.CO)

तृतीय - प्रिया वाणी (S.Y.EPS.)

रांगोळी स्पर्धेमध्ये मुलींनीच नव्हे तर मुलांनीसुद्धा भाग घेतला. या स्पर्धेचे विजेते आहेत-

प्रथम - पूजा पाटील (S.Y.I.S.)

द्वितीय - गणेश मोरे (T.Y.I.S.) आणि

पद्मजा पोद्दार (S.Y.EPS.)

मेंहदी स्पर्धेमध्ये सुद्धा बराच उत्साह होता व सर्व स्पर्धकांचे हात मेंदीमुळे फार सुंदर दिसत होते. या स्पर्धेचे विजेते असे आहेत -

प्रथम - पूजा पाटील (S.Y.I.S.)

द्वितीय - पद्मजा पोद्दार (S.Y.EPS.)

२५ तारखेला 'Frienship Day' व 'Chocolate Day' होता. पण या दिवशी कुठलीही स्पर्धा किंवा कार्यक्रम नव्हता.

२६ तारखेचा दिवस फार मोठा होता. या दिवशी दोन महत्त्वाचे कार्यक्रम होते, ते म्हणजे 'Techfest आणि Funfair.'

'Techfest' ही नवीन स्पर्धा या वर्षी प्रथमच आयोजित करण्यात आली. ही कल्पना व त्यामागील सर्व काम व योजना S.Y.I.F. मधल्या हर्षद बंगेरा व त्याच्या वर्गमित्रांनी केली. विद्यार्थ्यांच्या अनेक गटांनी बुद्धीला चालना देऊन धावणाऱ्या चारचाकी गाड्या तयार केल्या. गाड्यांचे दिशा नियंत्रण व वेग महत्त्वाचे होते. या गाड्यांची शर्यत घेण्यात आली. व प्रथम बक्षीस गेले F.Y.EPS. च्या Shishir Parab & Group या गटाला. सर्व गटांनी चांगला प्रयत्न केला. स्वत: प्राचार्यांनी ही स्पर्धा पाहिली व मुलांच्या रचनात्मक बुद्धीचे त्यांनी कौतुक केले.

तसेच त्या दिवशी 'Funfair' सुद्धा होते. खाण्यापिण्याची व खेळाची संपूर्ण सोय 'Funfair' मध्ये होती. तसेच या दिवशी 'Denim Day' असल्याने सर्वजण Jeans चे पोशाख घालून आले होते. Funfair चा उपभोग सर्वांनी घेतला व बक्षिसे गेली चांगल्या पदार्थ व खेळाच्या 'Stalls' ना ज्यांचे 'Presentation' उत्तम होते. बक्षिसे अशी होती.

Foodstall -1st - Angel Group - T.Y.I.S.

2nd-Chinmay Joshi & Group-S.Y.I.S.

Game Stall - 1st Harshit Jain & Ashwin Prabhu (S.Y.I.E.)

2nd - Sanjay More & Group (T.Y.EPS)

२७ तारखेला Quiz होती. मुलांना स्वत:च्या College बद्दल जास्तीत जास्त माहिती करून देणे, हा या Quiz चा हेतू होता. Quiz मधील प्रश्न फक्त College व स्वत:च्या विभागाबद्दल होते. Quiz फार अटीतटीची झाली, पण EPS Deptt. विजेते ठरले.

तसेच Floral Decoration म्हणजे 'फुलांची सजावट' ही स्पर्धा होती. प्रथम बक्षीस मिळाले S.Y.I.S. च्या Pooja Patil हिला. २९ तारखेला प्रथम थोरले बाजीराव सभागृहात 'Tie-King & Saree Queen Contest' होती. तसेच हा दिवस Tie & Saree Day असा होता. मुलं Tie, तर मुली साड्या नेसून आल्या होत्या. Tie King & Saree Queen Contestला बऱ्याच प्रवेशिका होत्या. अखेरीस प्रश्नांची उत्तम उत्तरे देणारे विजेते ठरले.

Tie King धवल पारेख - T.Y.CH.

Tie King Runner up निखिल पुजारी - S.Y.EPS.

Saree Queen अनघा हरवंदे - T.Y.I.F.

Saree Queen Runner up मिहीका करकरे - F.Y.I.E.

यानंतर Magazine Committee ची वादविवाद स्पर्धा घेण्यात आली. त्याचे विषय व विजेते असे होते.

1st Topic - Is Honesty the Best Policy?

Winner - For Group - वैभव खेर आणि ग्रुप (S.Y.I.E.)

2nd Topic - Shoud the world turn to Veg. diet?

Winner - For Group - ओमकार शेवडे आणि ग्रुप

३० तारखेच्या दिवसाची सुरुवात श्री. विघ्नेश जोशी यांनी 'हसतखेळत' हा कार्यक्रम सादर करत केली. श्री. विघ्नेश जोशी हे नामवंत मराठी नाट्य आणि दूरदर्शन मालिकेतील युवा अभिनेते या दिवशी आले होते. त्यांनी




डॉ. विघ्नेश जोशी 'हसतखेळत' या कार्यक्रमात



सौ. सुमेधा वेडेकर यांचा सत्कार करताना उपप्राचार्य श्री. नायक (परीक्षक गायन स्पर्धा)

विनोद, खेळ व संगीत यांचे अप्रतिम मिश्रण केले व विद्यार्थी आणि शिक्षकांनासुद्धा या कार्यक्रमात ओढले.

यानंतर बक्षीस-समारंभ होता. श्री. विघ्नेश जोशी यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. तोपर्यंत झालेल्या स्पर्धेची बक्षिसे दिली गेली. कार्यक्रमाची बक्षिसे, तो कार्यक्रम संपताच देण्यात येतील असे ठरवले गेले.

पूजा पाटील (S.Y.I.S.) हिला Best All round performer म्हणून बक्षीस देण्यात आले.

यानंतर Singing Competition झाली. पाहुण्या परीक्षक म्हणून सौ. सुमेधा वेडेकर आल्या होत्या व त्यांच्या उपस्थितीमुळे या गायन स्पर्धेची शोभा वाढली होती. तंत्रनिकेतनातील परीक्षक म्हणून कार्यालयातील श्री. पुराणिक होते. सर्वांनी सुश्रवणीय गाणी म्हटली, बक्षिसे खालील जणांना मिळाली.

Solo - 1st रोहन आगाशे (S.Y.I.E.)

2nd मिथिला रानडे (F.Y.I.E.)

आणि प्रेमकुमार पांडे (T.Y.CH.)

Duet/Group 1st विकास जगताप (T.Y.I.E.)

आणि रवींद्र तोडकर (T.Y.EPS.)

हे सर्व सांस्कृतिक कार्यक्रम सुरू असताना Sports सुद्धा २२ तारखेपासून सुरू झाले होते. व ३० तारखेला अंतिम फेऱ्या होत्या.

Sports मध्ये बरेच खेळ होते जसे -

Indoor Games 1) Chess

2) Carrom (Doubles & Singles)

3) Table Tennis (Singles)

Outdoor Games 1) Cricket

2) Volley Ball

शेवटच्या दिवशी म्हणजे ३१ तारखेला Dance Competition होती. अनेकांनी भाग घेतला, काही Solo Dances तर काही Group Dances असे होते. सर्वांनी निरनिराळे पोशाख घालून फार सुंदर नृत्य केले. Dance Competition चे विजेते असे आहेत.

Solo - 1st - अमर कऊप (F.Y.I.S.)

2nd - भूषण गंबीर (T.Y.I.S.)

Group - 1st - एन्जल ग्रुप (T.Y.I.F.)

2nd - प्रदीप लाहोट ग्रुप (S.Y.EPS.)

तसेच बऱ्याच Danceची Choreography करणाऱ्याला Best Choreographer म्हणून बक्षीस दिले गेले.

तसेच Sports Committee ची बक्षिसे या दिवशी देण्यात आली.

सर्वांनी टाळ्यांच्या अल्होषात विजेत्यांचे अभिनंदन केले. तसेच डॉ. अरुण पाटील यांनी आयोजित केलेल्या Aids Awareness Cycle Rally मध्ये आपल्या Collegeची जी मुले गेली होती, त्यांचा सत्कार केला गेला. तसेच स्वत: डॉ. अरुण पाटील यांनी Aids Awareness वर मुलांना मार्गदर्शन दिले व ते अतिशय महत्वपूर्ण होते. खास करून युवा विद्यार्थ्यांसाठी सर्वांनी या 'Seminar' बद्दल चांगली प्रतिक्रिया व्यक्त केली.

असे हे Cultural Test 'Polyspark' 2003-2004 समाप्त झाले व आठवडाभरच्या मस्तीनंतर पुन्हा अभ्यासाचा काळ सुरू झाला.

### आश्रयची एड्स् जनजागरण सायकल रॅली

डिसेंबर १९ ला सायकल रॅली असल्याची घोषणा डॉ. अरुण पाटील यांनी आश्रय डायबेटिक क्लबच्या मासिक सभेत केली. १ महिना आधीपासून आश्रयचा प्लॉट ते बदलापूर हायवेला ११ कि. जाऊन ११ कि. येऊन अशी २२ कि. मी. ची रोज सकाळी प्रॅक्टिस चालू झाली. श्रीगणेशाचे स्मरण करून सुरू झालेल्या सायकल रॅलीच्या प्रॅक्टिसला नियमितपणे २५ ते ३० मुले सायकलस्वार जमायचे, तर इतर जसा वेळ मिळेल तशी नित्य प्रॅक्टिस करायचे.

सायकल चालविण्याच्या प्रॅक्टिसबरोबरच रॅलीची इतरही तयारी चालू झाली. नियमित सरावामुळे दमछाक होऊ नये व स्टॅमिना वाढावा यासाठी डॉक्टरांच्या सल्ल्याने कॅल्शियम व प्रोटीन पावडरचा आवश्यक खुराकही चालू करण्यात आला. श्री. शेखर चिटणीस यांनी सर्वांना १२० रु. किमतीची प्रोटीन पावडर या प्रकल्पासाठी प्रायोजित केली. सर्व सायकलस्वारासाठी आश्रयची खास ओळख म्हणून यावर 'आश्रय ट्रस्ट व एडस् विरोधी अभियान' असा मजकूर शब्दांकित करण्यात आला होता. असा एक टी-शर्ट व एक कॅप प्रत्येकी देण्यात आली. ती प्रायोजित केली ओमकारच्या श्री व सौ. कुलकर्णी यांनी.

जिनेक्स फार्माच्या आशिष देवरे व रोटरी क्लब ऑफ डोंबिवलीचे अध्यक्ष श्री गणेश यांनी जाहिरात पत्रके दिलीत.

श्री. अनिल जोशी यांनी अॅम्ब्युलन्स, पंक्चर, सायकली, औषधी साहित्य यासाठी तसेच क्रांती जाधव यांनी सुमो, डॉ. राम व वर्षा लोखंडे यांनी बिस्कीट, टॉफीज, सरबत, जेवण, आगरी सेना अध्यक्ष राजाराम साळवी, केशव भोईर, श्री. विलास देशमुख, डॉ. मुंबईकर, सुखदेव चिराटे, डॉ. उज्वला ओतुरकर, श्री. मलवारी, सुलोचना जाधव, चंद्रकांत संतोष, सौ. जोशी, अरुण मराठे, श्रीकांत लोखंडे, गणेश सरणकर, संपत पदमेरे यांच्यातर्फे वास्तव्य. उज्वला ओतूरकर, सुलोचना मावशी, एम्.आय.डी.सी. रेस्ट हाऊस यांच्यातर्फे करण्यात आली होती.

रॅलीचा दिवस जवळ जवळ येत होता तसतसा लोकांचा सहभाग रॅलीमध्ये वाढत होता. ३९ जण सायकलवर, पाच मोटर सायकलस्वार होते. त्यामध्ये व्ही.पी.एम्. कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर भाग घेतला होता. त्यांच्यासाठी हे सगळे

औत्सुक्यपूर्ण व कुतूहल होते. नाविन्यपूर्ण होते.

रॅलीचा दिवस जवळ येत होता आणि आमची तयारीही जोमाने सुरू होती. सौ. ज्योती साठवणे यांच्या मार्गदर्शनाखाली बसविलेले भारूड. व्ही.पी.एम्. कॉलेजच्या मुलांनी त्याची चांगली प्रॅक्टिस केली. सुनील पाटीलच्या कविता कीर्ती, संपदा, कानन, करुणा यांचे पथनाट्य, गौरव वरणजीतचे भारूड. हितेश साठवणे व गोरखची सिनेमाच्या चालीवर एडस्ची कविता, असे विविध कार्यक्रम जनजागरणाच्या उद्देशाने बसवण्यात आले.

आश्रयच्या या बहुउद्देशीय सायकल रॅलीचा मुख्य उद्देश होता - एडस् जनजागरणाचा. पण त्यासोबतच १) सायकल वापरा, प्रदूषण टाळा. २) सायकल चालवा, आरोग्य उत्तम ठेवा. ३) गडसहलींची आवड सर्वांमध्ये निर्माण व्हावी व ४) साहसी वृत्तीचा विकास व्हावा हेही महत्त्वाचे उद्देश होते.

अखेर रॅलीचा तो रोमहर्षक दिवस उजाडला. शुक्रवार दि. १९ डिसेंबर २००३ रोजी पहाटे ५.०० वाजता सर्व सायकलस्वार शिवाजी पुतळ्यासमोर जमले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला हार घालून सायकल रॅलीचे उद्घाटन केले गेले व एडस् विरोधी अभियानाला सुरुवात झाली. व्ही.पी.एम्. कॉलेजचे काही विद्यार्थी ओमकार, मनू नायर, तुलसीदास मांजरेकर, विनोद आहेर हे आदल्या दिवशी रात्रीच डोंबिवलीला आले व संजीवनी हॉस्पिटलला राहिले. त्यामुळे ते वेळेवर पोहोचू शकले. ठीक ५. ३० वाजता सर्व सायकलस्वारांनी कल्याणच्या दिशेने कूच केले.

हे सारे रोमांचकारी क्षण टिपण्यासाठी 'ई.टी.व्ही. मराठी'चे श्री. केतन दुर्वे. 'जनमत वार्ता'च्या सुनीता कामत, तुषार राजे, 'सह्याद्री टी.व्ही.'चे बापू वैद्य हे उपस्थित होते. समोर पोलिसांच्या गाड्या, मागे पोलिसांच्या गाड्या वाहतूक नियंत्रणासाठी अशी ही रॅली एडस्विरोधी घोषणा देत निघाली.

कल्याण सोडल्यानंतर शहाडला आगरी सेना अध्यक्ष राजाराम साळवी व केशव भोईर यांच्यातर्फे सर्वांचे स्वागत फुलांचे हार देऊन व चहा-बिस्किटांनी करण्यात आले. रायताला दुसरा पडाव पडला तिथे शाळेमध्ये पथनाट्य, भारूड सर्व प्रोग्राम झाले. मुख्य अतिथी म्हणून किशन कथोरे साहेब (ठाणे) विजय पवार, गजानन पवार, अन्नू सुलेशी, मेहतकर सर, दिनेश सुलेशी पानवाले उपस्थित होते. त्या शाळेतील एका विद्यार्थ्याने एडस्वर कविता करून चांगल्याप्रकारे म्हणून दाखविली.

या घटनेने डॉ. अरुण पाटील यांच्यासह आम्ही सर्व सायकलस्वार अत्यंत आनंदित झालो. कारण याचसाठी केला होता अट्टाहास की जग जागे व्हावे एडस्बाबत ! आम्हाला जो संदेश पोहोचवायला होता तो पोहोचवला. पहिल्याच ठिकाणी मिळालेल्या या यशाने प्रफुल्लित होऊन उत्साहाने पुढे निघालो.

मामणोली येथे इंग्रजी माध्यमाच्या शाळेत ऑंकार, मनू, तुलसीदास, विनोद, हितेश, अमीत यांनी छानसे भारूड म्हणून दाखविले. पथनाट्य तसेच मुलांनी घोषणा म्हटल्या सायकलस्वारांनी त्या सांगितल्या. येथील मुलं अतिशय सुदृढ होती. जवळजवळ ३००० विद्यार्थ्यांसमोर एडस्ची माहिती देण्यात आली. त्याआधी गोवेली येथे एका जिल्हा परिषदेच्या शाळेत हा ताफा थांबला होता.

तेथील विद्यार्थी अतिशय नीटनेटके होते. स्वागतासाठी सगळ्या मुलांनी स्वत: फुलापानांचा उपयोग करून गुच्छ तयार केला होता. फळ्यांवर अतिशय उत्कृष्ट चित्रे काढली होती. वर स्लोगन्स् लटकवली होती. मुलांनी चांगल्या आवाजात प्रार्थना म्हणून दाखवली. अशा अभिनव शाळेत मुलांना एडस्बद्दल माहिती देण्यात आली.

क्षीरसागर मॅडम व भांबेरे सर, संतोष भरणुके, डॉ. शांदारकर सरांनी सर्वांचे येथे स्वागत केले.

शिवळे येथे आम्हाला संध्याकाळी पोहोचायचे होत. आमच्या रॅलीचे ठिकठिकाणी झालेले स्वागत व कार्यक्रमाचा परिणाम यांनी आम्ही भारावून गेलो. आम्ही एवढे आनंदात होतो की रणरणत्या उन्हाची पर्वा न करता आमचा सर्व कार्यक्रम आम्ही सादर केला. संध्याकाळी शिवळे येथे पोहोचल्यावर बी.एड्. कॉलेजमध्ये आमचा प्रोग्राम झाला. येथे डॉ. अरुण पाटील यांच्या हस्ते स्लाईड शो दाखविण्यात आला. या कॉलेजचे वैशिष्ट्य म्हणजे येथे महाराष्ट्रातील सर्व भागांतून आलेले विद्यार्थी होते. हे जेव्हा शिक्षक बनतील तेव्हा संपूर्ण महाराष्ट्रात आम्ही दिलेली माहिती पोहोचवण्याचे आश्वासन आम्हाला मिळाले. डॉ. भानुशाली सर येथील प्राचार्य होते. त्यांची व डॉ. अरुण पाटील यांच्या शाब्दिक जुगलबंदीला तर तोड नव्हती. दिवसभराचा थकवा कुठल्याकुठे पार पळून गेला. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी ५ वाजता शिवळे येथे आमदार गोटीराम पवार यांच्यातर्फे सर्व मुलांचे स्वागत करण्यात आले. शिवळे आरोग्यकेंद्रात गावकऱ्यांसमोर मुलांनी एडस्‌विषयक कार्यक्रम केला. भोजन केल्यानंतर सायकली तिथेच ठेवण्यात आल्या. व भुवन येथे ६ कि.मी. चांदण्यात शेतातून चालत आलो. तिथे शेकोटीभोवती रात्री उशिरापर्यंत मुलांचे आनंदाने गाणे, मनोरंजनात्मक प्रोग्राम झाले. तिसऱ्या दिवशी दुपारी खारेघर भुवन गावात एडस्‌विषयक पत्रक वाटली. मनू नायर येथे घोषणा दिल्या व गावात सर्व मुले सायकली फिरून घोषणा देत होती. सकाळी नाश्ता केल्यावर गोरखगडावर जाण्यासाठी निघालो. जाताना रस्ता फार अवघड म्हणजे फक्त दगडांचा चढ व उताराचा असा होता. ६ कि.मी. अशाच रस्त्याने जावे लागले. ५ मुलांच्या सायकली त्यामुळे पंक्चर झाल्या. श्री.कुळे व दिलीप शेळके यांनी येथे सोय केली होती. इथल्या काळ्या कातळ सह्याद्रीच्या भिंतीबरोबर हिरव्यागार वनश्रीची जोड लाभल्यामुळे हा भाग निसर्गसौंदर्याने नटलेला आहे. गोरख व मच्छिंद्रगड या दोन्ही किल्ल्यांची उंची दोन ते अडीच हजार फुटांच्या आसपास आहे. सुळकेसुद्धा अगदी लहानखुरे व ठेंगणे वाटतात. अहूपे घाटाच्या शेवटी देहरीवरून सरळ गोरखगडावर जाणारा रस्ता आहे. गोरखगडाच्या पायथ्याशी असलेल्या गावात परत आमचा सर्व प्रोग्राम झाला.

भुवन येथे मावशीच्या घरातील सर्वांनी आमचे अतिशय लाड केले. त्या गावातील गल्लीगल्लीत जाऊन मुले माहिती देत होती. येथे शेवटला प्रोग्राम झाला. खारेघर हे त्यांच्याच बाजूला असलेले अतिशय स्वच्छ असे खेडे. येथे सरपंच, पोलीस पाटील आले होते. सौ. सुनीता भाग्यवंत-संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती, मुरबाड, बाबाबाई अध्यक्षा, महिला मंडळ, मुरबाड यांच्या वतीने नाश्ता देण्यात आला. भुवन येथे मावशीच्या जेवणाचा पाहुणचार घेऊन मुले जड अंत:करणाने परतीच्या प्रवासाला लागली.

मध्ये कुठेही न थांबता ७ वाजता कल्याणला पोहोचलो. तीथे पोलीस ऑफिसर्सतर्फे डॉ. अरुण पाटील व त्यांच्या सोबत असलेल्या सायकलस्वारांचे कौतुक करण्यात आले. घरी परतण्याचा आनंद तर होताच, पण रॅली एवढ्यातच संपणार याची हुरहुरही होती. एका डोळ्यात हसू तर एकात आसू अशी अवस्था सर्वांची होती. परतीच्या या प्रवासात मावशीने लिंबू-सरबत बांधून दिले. ते पिऊन मुले थकवा घालवीत होती. काही कार्यक्रमांचे संचालन व्ही.पी.एम्.च्या मुलांनी केले. हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य होते.

शिवळे या गावात एडस्‌चे नऊ पेशंटस् आहेत. त्यामुळे तेथील लोकांनी एडसबद्दल बरेच प्रश्न विचारले व

आपल्या शंकांचे धीटपणे निरसन करून घेतले. त्यांनी आश्रयचे आभार मानतानाच अशी उपयुक्त माहिती नेहमी दिली जावी अशी अपेक्षाही व्यक्त केली. त्यांची ही विनंतीवजा अपेक्षा डॉ. अरुण पाटील यांनी मान्य करून जरूर पुन: त्यांच्या गावात येण्याचे आश्वासन त्यांना दिले.

आणि शेवटी अंगात संचारल्याप्रमाणे 'शूर आम्ही सरदार आम्हाला काय कुणाची भीती. देव देश अन् आश्रयपायी सायकल घेतली हाती' असे म्हणत सर्वजण आश्रयच्या या अद्वितीय पराक्रमाची कहाणी गल्लीत, मित्रमंडळीत, नातेवाईकांत सांगण्यासाठी घरी परतले !

या सर्व सायकलवीरांचा सत्कार अत्यंत उत्साहाच्या वातावरणात झाला. २३ डिसेंबरला संध्याकाळी हास्यक्लबतर्फे ३१ डिसेंबरला दुपारी २ वाजता व्ही.पी.एम्. पॉलिटेक्निक ठाणे येथे २८ डिसेंबरला आश्रय डायबेटिक क्लबमध्ये सर्वांना मान्यवरांच्या हस्ते सर्टिफिकेट देण्यात आली. पुढच्या वर्षीची वाट आता बघावी लागणार. डॉ.अरुण पाटील कधी रॅलीची घोषणा करतात ते, ही रॅली कधीच संपू नये असे वाटते. कारण इतके आनंदाचे क्षण उपभोगायला मिळतात की ते कधी विसरणे शक्यच नाही. त्याबद्दल डॉ. अरुण पाटील यांना धन्यवाद.

## प्रयोगशाळेतील सुरक्षा

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभाग व इंडियन केमिकल सोसायटी, मुंबई शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे महाविद्यालय परिसरातील थोरले बाजीराव पेशवे सभागृहात 'प्रयोगशाळेतील सुरक्षा' या विषयावर एकदिवसीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमाच्या उद्घाटन सत्रास प्रमुख पाहुणे म्हणून टेक्सन लॅबचे संस्थापक संचालक श्री. उल्हास निमकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान



दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन करताना श्री. उल्हास निमकर सोबत प्रा. स. ग. मेंढेकर, डॉ. सौ. पेजावर, प्रा. प्रकाश माळी

विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा.ना.बेडेकर यांनी भूषविले होते. कार्यक्रमाचे स्वागतपर प्रास्ताविक रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख, वरिष्ठ प्रा. स. ग. मेंढेकर यांनी केले. या विषयावर परिषद आयोजित करण्यामागील हेतू त्यांनी स्पष्ट केला. प्रमुख पाहुण्यांच्या भाषणानंतर झालेल्या बीज भाषणात बीएआरसीच्या डॉ. तुलसी मुखर्जी यांनी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनच्या आधारे या विषयाचे गांभीर्य स्पष्ट केले. डॉ. वा.ना. बेडेकरांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. पेजावर यांनी उद्घाटनाच्या कार्यक्रमात आभार मानून आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्राचे सूत्रसंचालन डॉ. अतुल बेडेकर यांनी केले.

दिवसभराच्या विविध सत्रांमधून विविध तज्ज्ञांनी प्रयोगशाळा सुरक्षिततेची मूलतत्त्वे, घातक रसायनांची हाताळणी, सुरक्षिततेसाठी वापरावयाची साधने, प्रयोगशाळांतील बरण्यांवरील लेबल्सबाबत काळजी, अशा अनेक विषयांवर मार्गदर्शन केले. डॉ. मनजीतसिंग यांनी प्रात्यक्षिकांसह दिलेली प्रथमोपचाराची माहिती फार उपयुक्त ठरली.

सदर परिषदेचे वैशिष्ट्य म्हणजे परिषदेस लाभलेला प्रचंड प्रतिसाद. निरनिराळी महाविद्यालये, रासायनिक उद्योगांतून सुमारे २६० प्रतिनिधी परिषदेस उपस्थित होते. प्रभारी प्राचार्य डॉ. सौ. माधुरी पेजावर व प्रा. स. ग. मेहेकर यांच्या मार्गदर्शनाखाली परिषद आयोजित करण्यासाठी रसायनशास्त्र विभागातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अतिशय मेहनत घेतली. कनिष्ठ महाविद्यालयातील रसायनशास्त्राचे प्रा. पी. एन्. सिंग यांनी आभार प्रदर्शन केले.

## कंपोस्ट खतनिर्मितीच्या प्रायोगिक प्रकल्पाचे उद्घाटन

विद्याप्रसारक मंडळाच्या, ठाणे कॉलेज या नावाने प्रसिद्ध असलेल्या महाविद्यालयाच्या आवारात वनस्पतिजन्य टाकाऊ पदार्थांपासून कंपोस्ट खतनिर्मिती करण्याचा मार्गदर्शक प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर सुरु करण्यात येत आहे.

येणाऱ्या काळातील सामान्य नागरिकांच्या समस्या व गरजा ओळखून सशक्त विचारांनी पुढे आणाऱ्या विद्याप्रसारक मंडळाने हा प्रकल्प सुरु करण्याचे ठरविले आहे. या प्रकल्पात सध्या तीन टन कचरा समावला जाऊ शकतो. तयार होणारे कंपोस्ट खत साठवण्याचीही सोय येथे आहे. विविध प्रयोग करण्यासाठी येथे स्वतंत्र सोय केली आहे.

आधुनिक रासायनिक खतवापराच्या नादात वैदिक काळापासून वापरण्यात येणाऱ्या कंपोस्ट खताकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. रासायनिक खतांच्या अतिवापराचे अनिष्ट परिणाम सप्रमाण सिद्ध होत असताना नैसर्गिक खत निर्मितीची विविध तंत्रे पुन्हा प्रकाशझोतात येत आहेत. अलीकडे झालेल्या अनेक प्रयोगांमुळे कमी वेळात जास्त प्रभावशाली खत उत्पादन करणे शक्य होत आहे.

स्थानिक ठिकाणची उसाची चिपाडे, निर्माल्य, मंडईतील व फुलबाजारातील कचरा, महाविद्यालयाच्या आवारातील गवत तसेच उपहारगृहातील कचरा यावर येथे प्रक्रिया केली जाते.

या प्रायोगिक प्रकल्पाच्या व्यवस्थापनाचे काम बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील वनस्पतिशास्त्र विभागाकडे आहे. आज गांडूळ व जीवाणू, कंपोस्ट खतनिर्मितीसाठी वापरले जात असताना अधिक जलद व प्रभावी असलेल्या बुरशीच्या तंत्राचा वापर फारसा होत असताना दिसत नाही. वनस्पतिशास्त्र विभागाचे डॉ. मोझेस कोलेट हे बुरशी तंत्रज्ञान वापरून हा प्रयोग हाताळत आहेत. पर्यावरण संरक्षणासाठी व्यक्तिशः कृतिशील असलेल्या व बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या सौ. माधुरी पेजावर यांनी या प्रकल्पास पाठिंबा व शुभेच्छा दिल्या आहेत.

दि. २६ जानेवारी २००४ रोजी महाविद्यालयाच्या आवारात ध्वजारोहण व राष्ट्रीय छात्र सेनेच्या सांस्कृतिक कार्यक्रमानंतर विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या शुभहस्ते या प्रकल्पाचे उद्घाटन झाले. या समारंभास विद्या प्रसारक मंडळाचे पदाधिकारी, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच नागरिक उपस्थित होते.

या प्रकल्पाबरोबर सध्या भेडसावत असलेल्या घनकचरा व्यवस्थापनाच्या प्रश्नावर उपाय शोधण्याचा प्रयत्न विद्याप्रसारक मंडळातर्फे करण्यात येणार आहे. हे तंत्रज्ञान निवासी संकुले, विविध मंडळे, ग्रामपंचायती, नगरपरिषद व महापालिका यांना उपयुक्त ठरणार आहे. या संदर्भात आवश्यक तंत्रज्ञान, मार्गदर्शन, बुरशी कल्चर इ. पुरविण्याचा मंडळाचा प्रयत्न असेल.

## ग्रंथालय व्यवस्थापनाचे बदलते आयाम

कल्याणच्या बिर्ला महाविद्यालयात झालेल्या 'ग्रंथालय व्यवस्थापनाचे बदलते आयाम' या विषयावरील

परिषदेत जोशी-बेडेकर महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे यांनी इलेक्ट्रॉनिक माध्यमांची बदलत्या व्यवस्थापनातील भूमिका मांडणारे पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन केले. बिर्ला महाविद्यालयाचे प्रा. अशोक सरदेसाई दीर्घ सेवेनंतर डिसेंबर अखेरीस निवृत्त झाले. त्यांच्या सत्कारानिमित्ताने झालेल्या या परिषदेत प्रा. बारसे यांच्याशिवाय डॉ. शरद गणपुले, प्रा. श्रीमती विजय राजहंस व गुरुवर्य प्रा. म. रा. रिसवाडकर यांची व्याख्याने झाली. आपल्या महाविद्यालय परिसरातील बांदोडकर महाविद्यालयाचे ज्येष्ठ ग्रंथपाल प्रा. मोहन पाठक, जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या साहाय्यक ग्रंथपाल सौ. मनीषा पाटील आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या निष्णात (M.Lib.) परीक्षेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर एकदिवसीय परिषद महाविद्यालयीन ग्रंथपाल व ग्रंथालयशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी होती. परिषद आयोजनात 'दिशा'चे जुने वाचक व बिर्ला महाविद्यालयाचे साहाय्यक ग्रंथपाल प्रा. सतीश डोंगरे यांचा मोठा वाटा होता. उद्घाटनपर सत्रात मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. स्नेहलता देशमुख यांच्या हस्ते सरदेसाई यांचा गौरव करण्यात आला. प्रा. अशोक सरदेसाई बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे संमंत्रकही आहेत.

**तंत्रनिकेतन वार्ता**

२२ ऑक्टोबर २००३ रोजी माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन थोरले बाजीराव पेशवे या सभागृहात पार पडले. यावेळी १९८६ ता सालातील विद्यार्थीही उपस्थित होते. त्यांनी आपल्या तंत्रनिकेतनाच्या प्रगती विषयी प्रशंसोद्गार काढले. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यावेळी उपस्थित होते. पूर्वीच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सर्वांना खूपच आनंददायक वाटत होते. यावेळी




माजी विद्यार्थी संवाद साधताना

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व माजी विद्यार्थी उपस्थित होते.

उपप्राचार्य श्री. नायक यांनी माजी विद्यार्थ्यांशी संवाद साधून तंत्रनिकेतनावरील घडामोडी त्यांना सांगितल्या. इ.पी. एस्. विभागप्रमुख सौ. वडेर यांनीही माजी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना पुढील सुधारणा तंत्रनिकेतन काय करणार आहे. यासंबंधी माहिती दिली.

विद्याप्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनच्या 'पॉलिझीन' या वार्षिकाचे प्रकाशन १७ जानेवारी २००४ रोजी थोरले बाजीराव सभागृहात झाले. यावेळी दूरदर्शन कलावंत 'अवंतिका' फेम सारिका निलाटकर यांना प्रकाशनासाठी आमंत्रित केले होते. तसेच डॉ. सौ. संगीता वैद्य-जोशी (ऑफिसर ऑन स्पेशल ड्यूटी अॅट दी डायरेक्टोरेट ऑफ टेक्निकल एज्युकेशन) यांना शैक्षणिक पारितोषिके देण्यासाठी आमंत्रित केले होते. त्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना सध्याच्या ग्लोबल इकॉनॉमीमध्येही स्वत: कसे पुढे यायचे व व्यक्तिमत्त्व विकास कसा घडवून आणायचा, हे सांगितले तसेच मोठ्या संधीची वाट पाहण्यापेक्षा स्वत:हून जी नोकरी उपलब्ध आहे ती करावी, असेही मार्गदर्शन डॉ. सौ. संगिता वैद्य-जोशी केले. सारिका निलाटकर यांनी विद्यार्थ्यांना आपले गुणवैशिष्ट्य ओळखून त्याप्रमाणे



डावीकडून सौ. प्रीता अजित (संपादिका), प्राचार्य श्री. मुजुमदार, डॉ. सौ. संगीता वैद्य-जोशी, कु. सारिका निलाटकर, वि. प्र. मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर, उपप्राचार्य श्री. नायक. 'पॉलिझीन' प्रकाशन समारंभ

करिअर करावी, असे सांगितले. वि.प्र. मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांनी उत्तरोत्तर 'पॉलिझीन' या वार्षिकात प्रगती होत आहे, असे प्रशंसोद्गार काढले.

प्राचार्य सौ. श्री. मुजुमदार यांनी थोडक्यात तंत्रनिकेतनातील घडामोडींचा आढावा घेतला. या समारंभास उपप्राचार्य श्री. नायक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या शैक्षणिक वर्षातील शेवटचा समारंभ म्हणजे 'पॉलिझीन प्रकाशन'. हा अत्यंत उत्साहात पार पडला.

**सौ. आनंदीबाई के. जोशी स्कूल - निरोप समारंभ (इ. १०वी.)**

नेमेचि येणाऱ्या पावसाळ्याप्रमाणे शालेय जीवनात दु:ख आणि आनंद या भावनांचा संगम घेऊन येणारा दरवर्षीचा निरोप समारंभ! यावर्षी ३१ जानेवारी २००४ ला हा निरोप समारंभ आयोजित केला होता. प्रथेप्रमाणे इ. ९वीच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. प्रार्थना गीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. शाळेच्या मुख्याध्यापिका कालिंदी कोल्हटकर यांनी प्रमुख पाहुणे उदय निरगुडकर यांचा परिचय करून दिला. श्री. उदय निरगुडकर हे गोदरेज लॉकिम येथे सीइओ या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी अनेक देशांचे दौरे केले आहेत. त्यामुळे अर्थातच अनुभवाचे भांडार त्यांच्याकडे आहे. त्यानंतर इ. १०वीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेला सामोरे जाण्यासाठी मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या.

इ. १०वी चे विद्यार्थी अमेय जोशी, गौतमी नेवाळकर, अक्षय तेलंग, अदिती जोशी यांनी आपल्या भाषणांमधून आपल्या भावना बोलून दाखवल्या.

प्रमुख पाहुणे उदय निरगुडकर यांनी आपल्या भाषणातून वक्तशीरपणाचे महत्त्व सांगितले. तसेच २१ व्या शतकाला सामोरे जाताना प्रत्येकाला विज्ञान तंत्रज्ञानाची अद्ययावत माहिती असली पाहिजे, असे सांगितले. एका मनोरंजक कथेद्वारे शिकणे व शिकवणे यातील फरक स्पष्ट केला व आपले देशोदेशीचे अनुभव विद्यार्थ्यांपुढे प्रकट केले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. बेडेकर यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा तर दिल्याच, शिवाय त्यांना देशोदेशी फिरून आपले अनुभवविश्व संपन्न करण्याचा सल्ला दिला.

अमृता सावंत या ९ वी तील विद्यार्थिनीने पूर्ण कार्यक्रमाचे संचालन केले, तर पूनम प्रधान हिने आभारप्रदर्शन केले. अशा प्रकारे शिक्षकांच्या दृष्टीने दरवर्षीच येणारा तरीही मनाला चटका लावणारा हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

विविध आंतरशालेय स्पर्धा, परीक्षा आणि पारितोषिके

१) **माध्यमिक शिष्यवृत्ती** - निखिल जोशी - १४ वा

तेजस सावंत - १४ वा

कौस्तुभ देशपांडे - २० वा

२) **ब्राह्मण सेवा संघ संस्कृत स्कॉलरशिप** -(इ. ९वी)

साहिल सकपाळ, अमृता ठोंबरे, गौरव तारकर,

प्राजक्ता प्रधान, प्रांजली शिरसाट, मिताली भेंडे

३) **राष्ट्रीय प्रज्ञा शोध शिष्यवृत्ती** - (इ. १० वी)

स्वप्नील घोडगे

४) **होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा** -

सुवर्णपदकासाठी निवड
पूनम प्रधान, विनीत देवधर - इ. ९ वी

ओजस गोहाड, ऋचा कारखानीस, गौरव कोर्डे

अजिंक्य, विराज - इ. ६ वी

५) **गणित प्रावीण्य** -

अमला भागवत, तन्मय चिपळूणकर, राहुल लटके, मिताली शेट्टी, गंधार सूर्यवंशी, ऋचा ठकार (इ. ५ वी.)

६) **राष्ट्रभाषा सभा पुणे हिंदी बालबोधिनी परीक्षा** -

मुंबई केंद्रात सर्वप्रथम - अमला भागवत

७) **भारत इंग्लिश स्कूल - पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन स्पर्धा**

सौमित्र अष्टपुत्रे, मनीष पाठक - तृतीय पारितोषिक

८) **ब्राह्मण सभा गीता पाठांतर स्पर्धा** -

सोनिया कारापूरकर - तृतीय पारितोषिक

९) **दीनदयाळ प्रेरणा केंद्र संस्कृत वैयक्तिक गायन स्पर्धा**-

आसावरी अभ्यंकर - प्रथम

गौरांगी मेहेंदळे - द्वितीय

१०) **सुरवाणी ज्ञानमंदिर संस्कृत कथाकथन स्पर्धा** -

सुरभी गोखले (इ. ५वी) - प्रथम क्रमांक

११) **पितांबरी मासिक कलरिंग स्पर्धा** -

सुरभी गोखले - द्वितीय क्रमांक

१२) राजमाता जिजाबाई ट्रस्ट -

**टिळक पुण्यतिथी वक्तृत्व स्पर्धा** -

सुरभी गोखले - प्रथम

मनीष काळे - द्वितीय

१३) **संस्कार भारती नृत्य गणेश कला साधक स्पर्धा** -
पूजा शहा - द्वितीय

१४) **श्री कला संस्कार रोटरी क्लब** -

मराठी नाटक शेपटीचा शाप -

उत्तेजनार्थ - दिग्दर्शन - प्रथम प्रियांका भांगले

१५) Thane Young Mens' Christian's Association Essay Competition

अक्षय दामले - प्रथम

मिहीर देवधर - द्वितीय

अकृती माहिमकर - तृतीय

१६) **टेबल टेनिस राज्यस्तरीय स्पर्धा** -

आकाश सोहनी - प्रथम

१७) **कराटे** - रिचा टिपणीस - सुवर्णपदक

१८) **कराटे - नॅशनल चॅम्पियनशिप**

सर्वेश देसाई - २ सुवर्ण १ ताम्र